जनशक्तीचा दबाव च्या सर्व सोशियल मीडिया व सर्व व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून
जाहिरात व बातमी
देण्यासाठी संपर्क
9619105773

# जनशक्तीचा दबाव

RNI No MAHMAR 2014 / 59698

जनशक्तीचा दबाव
प्रतिनिधी पाहिजेत...
संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हा,तालुका तसेच ग्रामीण स्तरावर प्रतिनिधी नेमणे आहेत. चांगले लिखाण व हुशार प्रतिनिधी पाहिजेत...
संपर्क :- +9189286 22416

• मुख्यसंपादक : गणेश पवार • किंमत : रु. २ । वर्ष १० । अंक ६ सोमवार । १२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी, २०२४ । पाने ६

## भारतीय मूल्यांवर आधारित शिक्षण व्यवस्था ही काळाची गरज - नरेंद्र मोदी



**टंकारा (गुजरात) :** भारतीय मूल्यांवर आधारित शिक्षण व्यवस्था ही काळाची गरज आहे. आर्य समाजाच्या शाळा यासाठी केंद्र बनल्या आहेत. देश आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे तिचा विस्तार करत आहे. या प्रयत्नांशी समाजाला जोडण्याची जबाबदारी आपली आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी येथे व्यक्त केले.

गुजरातमधील मोरबी जिल्ह्यातील टंकारा येथे आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. लोक गुलामगिरीत आणि अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेले असताना भारतीय समाजाला वेदांकडे परत जाण्याचे आवाहन करणाऱ्या समाजसुधारकाचे मोदींनी कौतुक केले.

मोदी म्हणाले की, स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म अशा वेळी झाला, जेव्हा भारतीय गुलामगिरीत आणि सामाजिक दुष्टचक्रात अडकले होते. स्वामी दयानंदजींनी तेव्हा देशाला सांगितले की, आपल्या रूढीवादी विचारांनी आणि अंधश्रद्धांनी देश व्यापला आहे. आपली वैज्ञानिक विचारसरणी कमकुवत केली आहे. या सामाजिक दुष्कृत्यांनी आपल्या एकतेवर हल्ला केला आहे. समाजातील एक वर्ग भारतीय संस्कृती आणि अध्यात्मापासून सतत दूर जात आहे. अशा काळात स्वामी दयानंदजींनी वेदांकडे परत जाण्याचे आवाहन केले, असेही त्यांनी सांगितले.

महर्षी दयानंद हे केवळ जागतिक ऋषीच नव्हते तर राष्ट्रीय चेतनेचे ऋषीही होते, ज्यावेळी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आमच्या सामाजिक दुष्कृत्यांचा मोहरा म्हणून वापर करून आमच्या लोकांना हीन बनवण्याचा प्रयत्न केला आणि काही लोक सामाजिक दुष्कृत्यांचा हवाला देऊन त्यांची राजवट योग्य ठरवत होते, तेव्हा दयानंद सरस्वतींच्या आगमनाने अशा कारस्थानांना धक्का बसला, असेही मोदी म्हणाले.

आर्य समाजाच्या या संस्थापकाने वेदांवर तार्किक स्पष्टीकरण दिले. सनातनींच्या रूढींवर खुलेपणाने हल्ला केला आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे खरे स्वरूप काय आहे, हे स्पष्ट केले. त्याचा परिणाम असा झाला की, समाजात आत्मविश्वास परत येऊ लागला. लोक वैदिक धर्म जाणून घेऊ लागले आणि त्याच्या शिकवणींशी जोडू लागले. लाला लजपत राय, राम प्रसाद बिस्मिल आणि स्वामी श्रद्धानंद यांसारखे क्रांतिकारक उभे राहिले ज्यांचा आर्य समाजावर प्रभाव होता, असेही ते म्हणाले.

## अशोक चव्हाणांचा आमदारकीचा राजीनामा



मुंबई : राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या आमदारकीचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे लवकरच त्यांचा भाजपामध्ये प्रवेश होणार असून चव्हाणांना थेट राज्यसभेत पाठवण्यात येणार असल्याचेही सांगण्यात येत आहे. अशोक चव्हाण यांच्यासोबत १० ते १२ आमदारांचा गटही भाजपामध्ये प्रवेश करणार असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा प्रवेश होईल, असे सूत्रांनी सांगितले.

मागील काही दिवसांपासून काँग्रेसमध्ये मोठी फूट पडणार असल्याची चर्चा सुरू होती. काही दिवसांपूर्वी दक्षिण मुंबईचे माजी खासदार मिलिंद देवरा यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर अगदी दोन दिवसांपूर्वीच काँग्रेसचे माजी आमदार बाबा सिद्दीकी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) प्रवेश केला. परंतु, त्यानंतर आता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते असलेले अशोक चव्हाण यांनीच काँग्रेसचा हात सोडण्याचा निर्णय घेतल्याने काँग्रेसला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. अशोक चव्हाणांनी सकाळीच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतल्याने याबाबतच्या चर्चांना उधाण आले.

अशोक चव्हाण यांच्याशिवाय काँग्रेसच्या आमदारांचा मोठा गट हा भाजपात प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. अशोक चव्हाण यांचा मोबाईल फोन सध्या नॉट रिचेबल आहे. त्यामुळे नांदेड काँग्रेसच्या वर्तुळात कार्यकर्ते अस्वस्थ झाले आहेत. त्याशिवाय नांदेडच्या चव्हाण समर्थकांकडून त्यांच्या भाजपा प्रवेशाचे पोस्ट व्हायरल होऊ लागल्या आहेत. गेल्या बऱ्याच काळापासून अशोक चव्हाण हे भाजपामध्ये जातील, अशी चर्चा होती. राज्यात झालेल्या सत्ताबदलानंतरही अशोक चव्हाण यांच्या मतदारसंघात सरकारने निधी दिला होता. याशिवाय, बऱ्याच काळापासून अशोक चव्हाण भाजपमध्ये जाण्याचा विचार करत होते, अशी चर्चा होती. परंतु, आता चव्हाणांनी भाजपावासी होण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात देण्यात येत आहे.

अशोक चव्हाण यांच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. कारण ज्यावेळी अशोक चव्हाणांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली, तेव्हा त्यांनी मी पुन्हा येतो असे विधानसभा अध्यक्षांना सांगितले. त्यामुळे त्यांची ही भेट कायदेशीर प्रक्रिया समजून घेण्यासाठी होती, असेही आता बोलण्यात येत आहे. त्यामुळे अशोक चव्हाण हे नेमके कधी प्रवेश करतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तर चव्हाण हे भाजपामध्ये गेल्यास महाराष्ट्रात काँग्रेस खिळखिळी होईल.

## दोन कम्युनिटी रेडिओ केंद्रांसाठी सिंधूरत्नमधून १ कोटी - उदय सामंत



**रत्नागिरी :** कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी चर्चा झाली असून, कृषी महाविद्यालय आणि फणस संशोधन केंद्रांचे प्रस्ताव लवकरच शासनाकडून मान्य करुन दिले जातील, असे कृषीमंत्र्यांनी सांगितल्याची माहिती देतानाच, दोन कम्युनिटी रेडिओ केंद्रांसाठी सिंधुरत्न योजनेमधून डा बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठाला १ कोटी दिले जातील, अशी घोषणा पालकमंत्री उदय सामंत यांनी केली.

लांजा तालुक्यातील गवाणे येथे डा बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्राच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन आज पालकमंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरु डा. संजय भावे, संचालक डा प्रमोद सावंत, डा प्रशांत बोडके, डा प्रकाश शिनगारे, नगराध्यक्ष मनोहर बाईत, सरपंच भीमराज कांबळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. सामंत म्हणाले, कृषी विज्ञान केंद्राच्या जमिनीचा उपयोग शेतकऱ्यांसाठी झाला पाहीजे. आधुनिक युगात अत्याधुनिक सुविधा शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे हा या केंद्राचा उद्देश आहे. रेशीम उद्योगाबाबत व्यापक बैठक आयोजित करतो. महिला, युवक यांना या उद्योगाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी विद्यापीठाने प्रयत्न करावेत.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातूनही प्रत्येक महिलेला रोजगार मिळवून देवू शकतो. कृषी महाविद्यालय आणि फणस संशोधन केंद्रासाठी ५० एकर जागा देण्याची जबाबदारी माझी आहे, असेही पालकमंत्री म्हणाले.

कोकण कृषी विद्यापीठाने नावाप्रमाणे चांगले काम करावे. संशोधनात्मक काम करुन शेतकऱ्यांपर्यंत त्याची माहिती पोहचवावी. त्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांना कर्जमुक्त बनवावे, असे मार्गदर्शन करावे. कोकण कृषी विद्यापीठ हे शेतकऱ्यांची मातृसंस्था आहे. त्याच मायेने शेतकऱ्यांना लाभ मिळावेत, असेही पालकमंत्री श्री. सामंत शेवटी म्हणाले.

कुलगुरु डॉ. भावे यांनी, आजचा शेतकरी हा अभ्यासू आहे. त्यांनी उत्पादकता वाढवलेली आहे. बांबूवर काम होणे आवश्यक आहे. १० हेक्टर जागा बांबूसाठी वापरली तर, आयात करायची आवश्यकता भासणार नाही, असे सांगितले.

प्रास्ताविकेत डॉ. सावंत यांनी कोकण कृषी विद्यापीठाचा इतिहास आणि सद्यस्थिती सांगितली. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते विविध उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. शेवटी डॉ. आनंद हणमन्ते यांनी आभार मानले. यावेळी कृषी स्टालला पालकमंत्र्यांनी भेट दिली.

## "नमो महारोजगार" मेळाव्यात उद्योजकांनी सहभागी होत रोजगाराच्या संधी द्याव्यात - एम देवेंदर सिंह



**रत्नागिरी :** ठाणे जिल्ह्यातील हायलँड ढोकाळी, माजीवाडा येथे २४ व २५ फेब्रुवारी रोजी "नमो महारोजगार" मेळावा होत आहे. या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील अधिकाधिक आस्थापना, उद्योजकांनी सहभागी व्हावे. तसेच बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज या संदर्भात बैठक झाली. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, प्रशिक्षणार्थी आयएएस डॉ. जस्मिन, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी सर्वसाधारण शुभांगी साठे, एम आय डी सी प्रादेशिक अधिकारी वंदना खरमाळे, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त इनुजा शेख, लोटे परशुराम इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष राज आम्रे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी शशिकांत कोतवडेकर, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक अमरजीत गायकवाड आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.सिंह म्हणाले, कोकण विभागाचा "नमो महारोजगार" मेळावा २४ व २५ फेब्रुवारी रोजी ठाण्यात होत आहे. यामध्ये आपल्या जिल्ह्याचा या मेळाव्यात मोठा सहभाग हवा. त्या दृष्टीने सर्व उद्योजक, आस्थापना यांनी आपला सहभाग नोंदवावा, या मेळाव्याच्या अनुषंगाने बेरोजगारांना अधिकाधिक नोकरीच्या संधी कशा उपलब्ध होतील, त्यादृष्टीनेही सर्वांनी प्रयत्न करावेत. त्याचबरोबर या मेळाव्याची व्यापक प्रसिध्दीही करावी.

## उद्याचे साहित्यिक घडविण्यासाठी शाळांना ग्रंथ भेट द्या - अशोक गाडेकर



**रत्नागिरी :** वाचन चळवळ वाढली पाहिजे. उद्याचे साहित्यिक घडविण्यासाठी शाळांना पुस्तकांचा संच, ग्रंथ भेट द्यावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आयोजित रत्नागिरी ग्रंथोत्सव २०२३ चे उद्घाटन श्री. गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर होत्या. ज्येष्ठ साहित्यिक मदन हजेरी, शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी दिपक झोडगे, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह श्रीकृष्ण साबळे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर ग्रंथ दालनाचे उद्घाटन करण्यात आले आहे. दीपप्रज्ज्वलनाने ग्रंथोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. श्री. गाडेकर म्हणाले, वाचन आणि भाषा चळवळीसाठी ग्रंथांचा उत्सव महत्वाचा आहे. यामधूनच ग्रंथांचा प्रसार होईल. वाचक, साहित्यिक, प्रकाशक हे ग्रंथोत्सवाची वाट पाहत असतात. ग्रंथालयाने पुढाकार घेऊन पुस्तकांचा संच द्यावा, त्यामधून उद्याचे साहित्यिक घडतील.

अध्यक्षीय भाषणात श्रीमती कीर म्हणाल्या, ग्रंथांची चळवळ हा लोकोत्सव व्हायला हवा. वाचनाने जगाकडे पहायची, जगण्याची सखोल दृष्टी मिळते. पुस्तके ही दीपस्तंभासारखी असतात, म्हणून पुस्तकांची संगत सोडू नये. वाचनाने अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात. शिवाय अनुभव संपन्नता मिळते. म्हणून वाचन अंगवळणी पडायला हवे. त्यासाठी लहान मुलांना वाचनाची आवड निर्माण करा.

ग्रंथालय निरीक्षक हेमंत काळोखे यांनी शेवटी आभार प्रदर्शन केले. सोनाली सावंत यांनी यावेळी सूत्रसंचालन केले.

सकाळी ८ वाजता जी.जी.पी.एस. हायस्कूल येथे ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. ग्रंथालय संचालक श्री. गाडेकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून, ग्रंथ पुजन करुन ग्रंथ दिंडीस सुरुवात करण्यात आली. संविधान आणि ज्ञानेश्वरी हे ग्रंथ पालखीत ठेवण्यात आले होते. सौ. गोदूताई जांभेकर विद्यालयातील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी मोठ्या संख्येने या दिंडी मध्ये सहभाग घेतला. ढोल, झांज, लेझीमच्या वादनात, 'वाचनाचा जपा नाद, ज्ञानाचा नको उनमाद', 'नको भेट वस्तू नको फुले, भेट द्या पुस्तके चांगले', 'वाचन केल्याने मिळते ज्ञान, दूर होते आपले अज्ञान' असे फलक घेऊन ही दिंडी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा शासकीय विभागीय ग्रंथालय या मार्गावर काढण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिक मदन हजेरी, शिक्षण विभाग (प्राथमिक) चे कार्यक्रम अधिकारी रविंद्र कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## जनतेच्या सेवेसाठी राजकारणात याल, पण तुम्ही किती सक्षम? - विनय सहस्त्रबुद्धे



**नवी दिल्ली :** आम्ही जनप्रियता आणि सक्षमतेच्या समन्वयाचं प्रशिक्षण देतो. त्यामुळे सुशासनच्या प्रक्रियेला बळ मिळतं. जर मी तुम्हाला विचारलं की तुम्ही राजकारणात का आलात? तर तुमचं थेट उत्तर असेल जनतेच्या सेवेसाठी. पण प्रश्न हा आहे की जनतेच्या सेवेसाठी तुम्ही किती सक्षम आहात? तुम्ही जनतेची सेवा कशी कराल? त्यासाठी तुम्हाला मोटिव्हेशनल ट्रेनिंगची सर्वाधिक गरज आहे, असं प्रतिपादन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे यांनी केलं.

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने सुशासन महोत्सवाचं आयोजन केलं आहे. त्यात प्रबोधिनीचे उपाध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे यांची प्रकट मुलाखत झाली. यावेळी त्यांनी अनेक विषयांना हात घातला. जगातील अनेक देशात लोकशाहीची अनेक रुपे दिसतात. लोकशाहीत जेव्हा तुम्ही निवडणुका जिंकता तेव्हा तुमची लोकप्रियता वाढते. पण मला आता दीनदयाल उपाध्याय यांनी सांगितलेली एक गोष्ट आठवतेय. ते म्हणायचे, लोकशाहीत केवळ निवडून येणं महत्त्वाचं नाही. तर लोकशाहीत लोकप्रतिनिधींची सक्षमता महत्त्वाची आहे. समाजाच्या संपर्कात राहण्याची सक्षमता असली पाहिजे, असं विनय सहस्त्रबुद्धे म्हणाले. क्षमतेचा विकासात तीन प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज आहे. पहिली म्हणजे मोटिव्हेशनल. मोटिव्हेशनल ट्रेनिंगने तुमच्यात कोणत्या प्रकारची क्षमता आहे, याचं तुम्हाला नेहमी भान राहतं. लोकांपर्यंत कसं पोहोचायचं आहे. लोकांसमोर कसं उभं राहायचं? लोकांना कसं प्रभावित करायचं? याशिवाय दुसरं म्हणजे फंक्शनल ट्रेनिंग. तुमच्या संकल्पना कशा अंमलात आणायच्या याचं आम्ही या अंतर्गत ट्रेनिंग देतो. त्यानंतर स्किल ट्रेनिंगचं काम होतं. याने तुमच्यातील मौलिक प्रतिभेचा विकास करण्याची संधी मिळते, अशी माहिती सहस्त्रबुद्धे यांनी दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेकदा सुशासनाचे उदाहरण मांडले आहेत. पंतप्रधानांनी सर्वात आधी नारा दिला होता. सबका साथ, सबका विकास. त्यानंतर त्यांनी त्यात सबका विश्वास हे जोडलं. त्यानंतर त्यांनी पुन्हा एक शब्द जोडला. सबका प्रयास. सुशासनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकांच्या गरजा आणि सहभागही महत्त्वाचा मानला आहे, असंही त्यांनी सांगितलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेवढेही शब्द दिले. त्यामागे सुशासनाचा हेतू होता. दिव्यांग शब्द दिला. त्यांनी अमृतकाळ, विकसित भारत, आत्मनिर्भरता आदी शब्द दिले. मोदींनी लिंग भेदभावावरून देशाला संदेश दिला. मोदी म्हणाले होते की, घरी मुलगी उशिरा आली तर आईवडील विचारतात कुठे होतीस? पण कधी तुम्ही मुलालाही हा सवाल केलाय का?, असं सांगतानाच मोदींचा हा विचार देश आणि समाजाचं लोकशिक्षण करणारा आहे. लिंगभेद मिटवणारा हा संदेश आहे. त्यतात सुशासन आहे, असंही त्यांनी सांगितलं.

## सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना खर्चाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



**रत्नागिरी :** जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी सर्व कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत माहे जानेवारी अखेर खर्चाचा आज आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झालेल्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, प्रशिक्षणार्थी आयएएस डॉ. जस्मिन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, उपजिल्हाधिकारी सर्वसाधारण शुभांगी साठे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहूल देसाई आदी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन अधिकारी सत्यविनायक मुळ्ये यांनी यंत्रणानिहाय वाचन करुन माहिती दिली. यावेळी जिल्हाधिकारी श्री. सिंह म्हणाले, नियोजनचे प्रधान सचिव सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चाबाबत दररोज माहिती घेत असतात. सर्व यंत्रणांनी हा निधी वेळेत खर्च करावयाचा आहे. ज्या यंत्रणांची अद्यापही प्रशासकीय मान्यता बाकी आहेत, त्या पूर्ण करुन घ्याव्यात. कोणतेही काम प्रलंबित ठेवू नये. विशेषत: जिल्हा परिषदेच्या विविध योजनांबाबत संबंधित विभाग प्रमुखांनी कटाक्षाने कार्यवाही करावी.

## मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकार विशेष अधिवेशन बोलवणार?



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने विशेष अधिवेशन बोलवावे, अशी मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर १६ फेब्रुवारीला विशेष अधिवेशन बोलवण्याचा निर्णय सरकार घेणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या विशेष अधिवेशनावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंतिम शिक्कामोर्तब होणार असल्याची माहिती मिळाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणासाठी दिलेल्या निर्णयावर पुनर्विचार याचिका सरकारकडून दाखल करण्यात आली. या आरक्षणावर सुनावणी सुरू आहे तर, दुसरीकडे मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण देण्याची मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगेंनी उपोषण केले होते आणि नंतर अंतरवाली सराटी ते मुंबई पायी दिंडी यात्रा देखील काढली होती. यानंतरच 'सगेसोयऱ्यांना' देखील कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत जीआर सरकारने काढला.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिल्या दिवशी विधिमंडळाच्या संयुक्त सभागृहात राज्यपाल रमेश बैस यांचे अभिभाषण होते. यानुसार, राज्याचे अर्थसंकल्पी अधिवेशन हे वर्षाच्या सुरुवातीला असते. या अधिवेशनात राज्यपालांचे अभिभाषण होत. त्यापूर्वीच मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन बोलवण्यात येण्याची शक्यता आहे. या अधिवेशनात राज्यपालांचे अभिभाषण होईल, अशी शक्यता वर्तवली आहे. या विशेष अधिवेशनात १६ फेब्रुवारीला विशेष अधिवेशनात मागासवर्ग आयोगाचा अहवाल मांडणार असून तो स्वीकारण्यात येईल, अशी शक्यता आहे. मराठा आरक्षणाचे विधेयक मांडण्याची शक्या आहेत.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे १० फेब्रुवारीपासून पुन्हा आमरण उपोषणाला बसले आहेत. मनोज जरांगेंच्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली आहे. पण मनोज जरांगेंनी उपचार घेण्यास नकार दिला आहे.

# संपादकीय

## फसवणूक कशी टाळाल?

पुलंच्या 'असा मी असामी' या गाजलेल्या आत्मकथनसदृश पुस्तकातल्या एका प्रकरणात बेमट्याचा बाप बेमट्याला म्हणतो की, "ब्रह्मदेवाने माणसास जन्मास घातले, पण त्याचा आवडता प्राणी गाढव. त्यामुळे त्याने सगळ्या मनुष्यप्राण्यात गाढवाचे गुण घातले. तस्मात, तू कुंभार हो, गाढवास तोटा नाही." हे आठवण्याचे कारण म्हणजे गेली काही वर्षे होत असलेले आणि बहुधा यापुढेही चालतील असे फसवणुकीचे प्रकार..

ई-मेल, व्हॉट्सअॅप, एसएमएस मार्फत काहीबाही भीती घालून किंवा आमिष दाखवून फसवणे जुने होऊ लागले. त्याला आता नवीन तंत्रज्ञानाचीही जोड मिळू लागली आहे. परंतु फसवणूक ही केवळ तंत्रज्ञान वापरूनच होते असे नाही. लोभ आणि भीती या दोन गोष्टी प्रत्येकामध्ये कमीअधिक प्रमाणात असतातच. आणि त्याचा पुरेपूर वापर करून, त्यामागची सर्वसामान्य माणसाची मानसिकता ओळखून असणारे ठग कोणालाही सहज वश करतात आणि आपला कार्यभाग साधून घेतात.

सिनेक्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्या तरुण तरुणींची संख्या कमी नाही. ही आसक्ती इतकी प्रचंड असते की जीवनाचा फारसा अनुभव नसलेल्या, चार पावसाळे न पाहिलेल्या तरुणाईला एखाद्या बड्या स्टार बरोबर काम करण्याचे आमिष दाखवून सहज फसवता येते. फसवणुकीचा हा प्रकार पूर्वापार चालत आला आहे आणि तरीही मोहात पडण्याच्या मानसिकतेत कोणताही बदल झालेला नाही. काही महिन्यांपूर्वी अशाच प्रकारच्या फसवणुकीची एक तक्रार मुंबई पोलिसांनी दखल करून घेतली. बॉलीवूडमध्ये काम करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची कंत्राटे घेणाऱ्या काही प्रसिद्ध कंपन्या आहेत. झाले असे की, अशाच एका कंपनीचे खोटे लेटरहेड छापून घेऊन एका दुकलीने एका तरुण मुलीला फसवले. तिला सांगितले गेले की आमची कंपनी चित्रपटांत कामे मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध असून तुम्ही आमच्याकडे आलात तर नक्की काम मिळेल.

बरे, हे काम कोणाबरोबर? तर चक्क रजनीकांत या सुपरस्टार दाक्षिणात्य अभिनेत्याबरोबर, त्याची मुलगी म्हणून. या दुकलीने त्या मुलीला सांगितले की, त्यांची कंपनी रजनीकांत यांना घेऊन दोन चित्रपट बनवित आहे. त्यात या मुलीची भूमिका रजनीकांत यांची मुलगी अशी असून ती सायबर चाचेगिरी करणारी आहे. आपली ऑफर खरी वाटावी म्हणून त्यांनी फोनवर गोडगोड बोलून त्या मुलीच्या मनात विश्वास निर्माण केला, हुबेहूब वाटतील अशी काही बनावट कागदपत्रे तयार केली. नंतर हळूहळू सरकारी नियमांची पूर्तता करणारी कागदपत्रे बनवायची आहेत, पासपोर्टची पडताळणी करायची आहे, परदेशी वापरता येईल असे क्रेडिट कार्ड बनवायचे आहे, इत्यादी सबबी सांगून त्या मुलीकडून काही लाख रुपये उकळले. त्यातल्या त्यात सुदैव म्हणजे त्या मुलीने आपल्या कुटुंबियांना हे सर्व सांगितले होते. काही दिवसांनी नुसताच वेळ जातोय, पुढे काही घडत नाहीये, आपण बहुधा फसलो, असा संशय आला, तेंव्हा मुलीच्या कुटुंबीयांनी पुढे काय झाले, काम कधी मिळणार, चित्रपटाचे शुटींग कधी सुरु होणार, वगैरे चौकशी करायला सुरुवात केली, तेंव्हा त्या दुकलीने काही ना काही कारणे सांगून टाळाटाळ सुरु केली. मग मात्र संशय वाढल्याने मुलीच्या कुटुंबियांनी सरळ पोलीस स्टेशन गाठले आणि रीतसर तक्रार दखल केली.

दुसऱ्या एका प्रकरणात एका मध्यमवर्गीय महिलेला एका खऱ्या वाटणाऱ्या व्हॉट्सअॅप मेसेजने फसवले. एका कंपनीत काम करणाऱ्या या महिलेला असा व्हॉट्सअॅप मेसेज आला की 'मी एका कंपनीच्या संचालकांबरोबर महत्त्वाच्या मिटिंगमध्ये आहे. त्यांच्यासाठी मला काही गिफ्ट व्हाउचर्स घ्यायची आहेत, ती पाठवण्याची तातडीने व्यवस्था करावी. व्हॉट्सअॅपचा संपर्क क्रमांक त्या महिलेसाठी नवीन होता, पण डीपीवर तिच्या बॉसचा फोटो दिसत होता. त्यामुळे विश्वासाने तिने सर्व व्यवस्था केली आणि डिजिटल गिफ्ट व्हाऊचर्स त्या व्हॉट्सअॅप संपर्कावर पाठवली. काही वेळाने त्याच क्रमांकावरून आणखी पाच गिफ्ट व्हाउचर्स पाठवण्याबद्धल मेसेज आला, तेंव्हा मात्र तिला काही संशय आला. तो तिने कंपनीतील आपल्या एका वरीष्ठ सहकाऱ्याच्या कानावर घातला. त्यानेही तो मेसेज तपासला, बॉस कुठे आहे त्याची चौकशी केल्यावर आपण फसवले गेल्याचे त्या महिलेच्या लक्षात आले आणि तिने लगेच पोलिसात तक्रार दाखल केली. सदर संपर्क क्रमांकाचा छडा लावून त्या ठगाला पकडण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे.

वाचकहो, पहिल्या प्रकारात पारंपारिक पद्धतीने फसवणूक केली गेली आहे, तर दुसऱ्या प्रकारात तंत्रज्ञानाचा वापर करून फसवणूक केली गेली आहे. अशा वेळी साहजिकच आठवतो तो समर्थ रामदासांचा 'अखंड सावधान असावे' हा मंत्र. थोडीशी सावधानता बाळगली, योग्य ठिकाणी चौकशी केली की अशा प्रकारची फसवणूक आपण टाळू शकतो. आपल्याकडून जी कृती होते, ती एकतर उत्तेजित झाल्यामुळे होते, किंवा घाबरल्यामुळे. अशावेळी सारासार विचार बाजूला पडतो आणि आपण चटकन काहीतरी कृती करून बसतो.

पहिल्या प्रकारात, मुलामुलींना सिनेसृष्टीचे आकर्षण वाटणे हा काही गुन्हा नाही. पण त्या तरुण मुलीने आणि तिच्या कुटुंबीयांनी एकदम पैसे देण्याआधी कंपनीची नीट चौकशी करायला हवी होती. उदाहरणार्थ All Indian Cine Workers Association, Western India Cinematographers Association, अशा ठिकाणी चौकशी करता आली असती, म्हणजे सत्य उघडकीस येऊ शकले असते.

दुसरा प्रकार हा तंत्रज्ञानाशी निगडीत असल्याने उत्तरोत्तर अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे. सायबर गुन्ह्यांचे आव्हान किती गंभीर आहे, हे आपण मागील एका लेखात वाचले असेलच. दुसऱ्या प्रकरणात महिला कर्मचाऱ्यास बॉसचा संपर्क क्रमांक माहित नव्हता, तरीही तिने घाईघाईने तथाकथित बॉसने सांगितल्यावरून व्हाऊचर्स खरेदी केली. जरी डीपीमध्ये बॉसचा फोटो असला, तरी हा संपर्क क्रमांक आपल्या मोबाईलमध्ये कसा नाही? आपल्या वरिष्ठांच्या किंवा इतर सहकाऱ्यांच्या मोबाईलवर तो आहे का? थोडे धीर धरून हे जाणून घेतले असते, तर फसवणूक झाली नसती. बॉसचा जो संपर्क क्रमांक आपल्याकडे आहे, तो वापरून खात्री करून घेता आली असती. तंत्रज्ञान हे दुधारी अस्त्र आहे. म्हटले तर मानवजातीच्या कल्याणासाठी, म्हटले तर फसवणुकीसाठी. आपली काळजी आपणच घ्यावी.

# निर्णय



**बऱ्याचदा आपण जी कामे करतो ती चांगली, वाईट आपल्या अनुभवावरून, अंदाजावरून, परिस्थितीवरून आपण अंदाज बांधू शकतो. स्वयंप्रेरणा आणि विश्लेषणात्मक विचार यांचा मेळ घालून निर्णय घेतल्यास तो कायम योग्य ठरू शकतो. आंतरज्ञानाच्या जोरावर आपण योग्य निर्णय घेऊ शकतो. सगळ्यात महत्त्वाचे योग्य निर्णय घेतांना जास्त विचार न करता तो वेळेत घेता आला पाहिजे. निर्णय घेतांना आपल्या काही मागील चुका झाल्या असतील तर त्यांचा बोध घेऊन त्यातून शिकले पाहिजे. आपल्या सर्वांनाच...**

जीवन जगत असतांना योग्य वेळी योग्य निर्णय घेता येणं फार महत्त्वाचं असतं. जर का आपण त्यावेळी योग्य निर्णय नाही घेऊ शकलो तर आपल्याला इतरांच्या मर्जी प्रमाणं वागावं लागतं. त्यांचं ऐकावं लागतं. म्हणून जीवनात ज्या-ज्या वेळी निर्णय घेण्याची वेळ येते त्यावेळी आपण ती घेतली पाहिजे. तसेही दररोज आपल्याला काही छोटे-मोठे निर्णय हे घ्यावेच लागतात. कधी भाजी कोणती घ्यावी, कोणता ड्रेस घ्यावा, गावी कोणत्या मार्गाने जावं, कोणते संगीत किंवा वाद्य शिकावं किंवा ऐकावं. असे रोजच्या जीवनात बरीच प्रश्न असतात. अशा छोट्या- छोट्या गोष्टींचे निर्णय घेता आले तर आपल्याला योग्य निर्णय घेण्याची कला आत्मसात होते. मग आयुष्यातील मोठे निर्णय घेणे ही अवघड जात नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे निर्णय घेतांना गरजेपेक्षा जास्त विचार करू नये. अति विचारामुळे ताण वाढतो. मग काय निर्णय घ्यावा हा प्रश्न पडतो. काय करू, काय नको अशी मनाची अवस्था होते. तेव्हा आपल्या निर्णय क्षमतेची मात्र कसोटी लागत असते. म्हणून



आपल्याला कमी वेळेत योग्य निर्णय घेता आला पाहिजे. बऱ्याच वेळेला आपण घरच्या मंडळींच्या दबावाखाली निर्णय घेतो. ती आपली आयुष्यातील सगळ्यात मोठी चूक असते. आपली क्षमता, आवड, कुवत आपल्याला ओळखता आली पाहिजे. आपण काय करू शकतो किंवा काय करू शकत नाही याची जाण आपल्याला असते. त्यामुळे स्वतःचे परीक्षण केले पाहिजे. त्यासाठी एखादी जबाबदारी स्वीकारली पाहिजे. त्यामुळे माणूस सजग राहतो. निष्काळजीपणा करत नाही. त्याच्या मनात नकारात्मक विचारांना थारा मिळत नाही. कोणतेही काम चांगले किंवा बिनचूक होईल की नाही ते काम पूर्ण झाल्यावर कळते. मात्र ते सुरू करणे किंवा त्यासाठी योग्य निर्णय घेणे जास्त महत्त्वाचे असते. त्यामुळे परफेक्शनचा विचार करण्यापूर्वी परिस्थिती नुसार निर्णय घेणं जास्त महत्त्वाचं असतं. जेंव्हा योग्य निर्णय न घेता आपण भरकट जातो, अतिविचार करतो याचा परिणाम आपल्या निर्णय क्षमतेवरही होतो.

बऱ्याचदा आपण जी कामे करतो ती चांगली, वाईट आपल्या अनुभवावरून, अंदाजावरून, परिस्थितीवरून आपण अंदाज बांधू शकतो. स्वयंप्रेरणा आणि विश्लेषणात्मक विचार यांचा मेळ घालून निर्णय घेतल्यास तो कायम योग्य ठरू शकतो. आंतरज्ञानाच्या जोरावर आपण योग्य निर्णय घेऊ शकतो. सगळ्यात महत्त्वाचे योग्य निर्णय घेतांना जास्त विचार न करता तो वेळेत घेता आला पाहिजे. निर्णय घेतांना आपल्या काही मागील चुका झाल्या असतील तर त्यांचा बोध घेऊन त्यातून शिकले पाहिजे. आपल्या सर्वांनाच एडिसन हे शास्त्रज्ञ माहित आहेत. ज्यांनी विजेचा शोध लावला. पण हा शोध लावण्यासाठी एडिसनला अथक परिश्रम घ्यावे लागले. निश्चय आणि निष्ठेने काम करावे लागले. बऱ्याच चुकांमधून शिकत- शिकत त्यांनी विजेचा शोध लावला. त्यामुळे कुठलीही गोष्ट करतांना होकार व नाकार या दोन्ही गोष्टींवर ठाम राहता आले पाहिजे. योग्य निर्णय घेण्यासाठी ह्या बाबी फार महत्त्वाच्या ठरतात. ज्या- ज्या लोकांना जीवनात ध्येय गाठायचे आहे, प्रगती करायची आहे, यशाचे शिखर पदाक्रांत करायचे आहे त्यांनी स्वतःची निर्णय क्षमता वाढवणे फारच गरजेचं आहे.अर्थातच प्रत्येकाने जीवनात योग्य निर्णय घेण्याची कला शिकायला हवी. आपल्या निर्णयावर आपले वर्तमान व भविष्य दोन्ही अवलंबून असतात. त्यामुळे सतत काही योग्य निर्णय आपण घेत गेलो तर ती कला विकसित होत जाते. निर्णय घेतांना सर्वप्रथम पर्यायांचा विचार आपण सकारात्मक व नकारात्मक या दृष्टीने केला पाहिजे.

उदा. आपल्याला शिक्षण घ्यायचे आहे. मग आपल्यासाठी कोणते शिक्षण योग्य आहे, आपली आवड, फील्ड विषयी माहिती असणे गरजेचे आहे. एखाद्याला छान गाता येतं, चित्र काढता येतं, खेळात नैपुण्य आहे मग प्रश्न पडतो कोणत्या क्षेत्रात करिअर करावं. तेव्हा आपण या सर्व पर्यायांचे सर्व पैलूंनी सूक्ष्म निरीक्षण करून निर्णय घेणे फार महत्त्वाचे आहे. निर्णय घेतांना कोठे व कधी थांबावे, कधी माघार घ्यावी, फायदा तोटा याचा पूर्ण विचार करूनच निर्णय घ्यावा. निर्णय घेतांना तो फार भावनिक होऊन घेऊ नये व वेळेचे भान सतत ठेवावे. कारण एखादा निर्णय घेण्यात खूप वेळ घालवला तर ती वेळही वाया जाते आणि दुसरे कामही होत नाही किंवा कशात लक्षही लागत नाही. त्यामुळे थकवा जाणवतो. आपण दिवसभरात जे- जे छोटे- मोठे निर्णय घेतो त्यामुळे व्यक्तीला मानसिक थकवा येतो. म्हणून ऑफिस मधले काम असेल, घरचे काम असेल त्याचा फार विचार न करता कमी वेळेत ते करसे होईल याकडे लक्ष द्यावे. कधी- कधी तर द्विधा मनस्थिती होते. अशा परिस्थितीत निर्णय घेणं फार अवघड होतं.

खरंतर डोक्यात सतत काही ना काही विचार असतात. काही विचार आपण सतत करत असतो. म्हणून विचार आणि अति विचार यातला फरकही आपल्याला कळायला हवा. अतिविचारामुळे आपली शारीरिक, मानसिक ऊर्जा खर्च होत असते. काही निर्णय हे लोकांच्या दृष्टीने हिताचे पण स्वतःच्या दृष्टीने हिताचे नसतात. तर काही निर्णय आपल्या हिताचे ते लोकांना चुकीचे वाटतात. पण आपण घेतलेल्या निर्णयावर ठाम राहिले पाहिजे. छोटे- छोटे निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. कधी- कधी आपण आपले निर्णय लिहून ठेवावे. ज्यावेळेस बिकट परिस्थिती येते त्या वेळेला त्या निर्णयामुळेच आपला आत्मविश्वास वाढतो आणि मोठमोठे निर्णय घ्यायला ही अडचण येत नाही. मोठे निर्णय घेतल्यामुळे सर्जनशीलता वाढते. व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो व आयुष्यात आपण यशस्वी होत जातो. निर्णय हा व्यक्तिगत, कौटुंबिक, कार्यालयीन किंवा कुठल्याही क्षेत्रात घ्यावयाचा असू शकतो. म्हणून विचारपूर्वक निर्णय घेतला पाहिजे. कारण एक निर्णय आपले संपूर्ण आयुष्य बदलू शकते किंवा त्याचा आपल्या आयुष्यावर परिणाम होऊ शकतो.

आयुष्यातले निर्णय चुकतात
आणि मग आयुष्य चुकत जाते
कधी कधी प्रश्न कळत नाहीत
आणि उत्तरही चुकत जाते
सोडवतांना वाटते सुटत गेला गुंता
पण प्रत्येक वेळी एक नवीन गाठ बनत जाते
दाखवणाऱ्याला वाट माहीत नसते
चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते
काही गोष्टी वाटतात तितक्या सोप्या नसतात
जेव्हा एखादी ठेच काळजाला लागते.

• • •

# मालक नव्हे पालक व्हायला हवे..

पालकांना आणि शिक्षकांना आपला विद्यार्थी हा आपल्या कल्पनेप्रमाणे घडावा अशी अपेक्षा असते. शिक्षकांच्या मस्तकातही आपला विद्यार्थ्यासंदर्भातही काही कल्पना असतात आणि त्या कल्पनेने मुलांना घडविण्याचा मार्ग ते अनुसरतात. पालकांच्या मनात काही स्वप्न असतात त्या स्वप्नांच्या परीपूर्तीसाठी पाल्यांवर काही लादणे घडत जाते. आपण मुलांना नैसर्गिक रित्या घडविण्याचा आणि घडू देण्याचा प्रयत्न कधीच करत नाही. खरंतर शिक्षण म्हणजे लादणं नाही..शिक्षण म्हणजे फुलवणे आहे.. बहरवणे आहे.. पण वर्तमानात मात्र असं काही घडतांना दिसत नाही. आपल्याला आपली मुले म्हणजे स्वप्न पूर्ण करणारी यंत्रना वाटत आली आहे. आपल्या अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचे ते माध्यम वाटत आले आहे.. पण त्यामुळे मुलांच्या आयुष्यातील आनंद हिरावून घेतला जातो हे लक्षात घ्यायला हवे. जीवन आनंद मुक्त असेल तर जीवनाला कोणताच अर्थ उरत नाही. शिक्षण हे आनंददायी आहे त्यामुळे शिक्षणात असलेल्या प्रत्येकाच्या चेह-यावर आनंद फुलून यायला हवा. आपण शिक्षणासंदर्भाने प्रतिष्ठेबददलच्या व्याख्या निर्माण केल्या आहेत. त्यामुळे ख-या शिक्षणापासून दूर जाणे घडत जाते.

परवा मित्रांकडे सहजतेने बसलो होतो. त्याचे अत्यंत गोड,गोंडस आणि अवघ्या सात आठ वर्षाचे मुल स्नेहसंमेलनाची तयारी करत होते.. शाळेत स्नेहसंमेलनाचे वातावरण सुरू झाले होते.त्यामुळे मुलं घरी देखील काही करू पाहत असतात.. पण त्याची नृत्याची तयारी पाहून आई त्याला म्हणाली " जरा, अभ्यास कर... नाचून काही मिळणार नाही.नाचन्यापेक्षा अभ्यासाकडे लक्ष दे. नाचणे वगैरे याचा काही उपयोग नाही जीवनात.. उपाशी मरावे लागेल..तुला बापासारखे डॉक्टर व्हायचे आहे हे लक्षात घे.." आता तर मलाही प्रश्न पडला होता. मुलाचे वय अवघ ८ वर्षाचे आहे. या वयात त्याला कुठे आपले जीवन कळणार आहे..? त्याला तर फक्त जेथे आनंद मिळेल अशा गोष्टी करण्यात त्याचा रस असणार होता. आनंद हेच कोणत्याही व्यक्तीसाठी जीवनाचा मार्ग आहे.तसेच बालकांचेही जीवन म्हणजेच आनंद.. तोच एकमेव मार्ग असतो. खरतंर मुलासाठी आपण कोणत्या वाटा निर्माण करतो त्याचा विचार करायला हवा.कदाचित मुलांला डॉक्टर बनविण्यात आईला अधिक उत्तम, श्रीमंत जीवन हवे असेलही. मुलांच्या व्यवसायातील पाऊले ही समाजाची सेवा असा उद्देश असतो की पैसा कमवणे असतो याचाही विचार करण्याची गरज आहे. अर्थात डॉक्टर होण्यात समाजाची सेवा असा विचार असण्याची शक्यता देखील फार कमी होत चालली आहे. खरंतर मुल स्वतः काय करते हे जाणून घेणे महत्वाचे आहे. त्याच्या वाटा त्याला निवडण्याचे स्वातंत्र्य त्याला मिळू दिले तर त्याला जीवनभरासाठीची आनंदाची वाच सापडण्याची शक्यता अधिक उंचावते.उत्तम नृत्य करणारा विद्यार्थी देखील लोकांच्या जीवनात आनंद पेरू शकतो. समाजात तुम्ही कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहात यावर प्रतिष्ठा नाही.. तर आपल्या मुलाच्या आयुष्यात किती आनंद पेरता याचा विचार करायला हवा. बालक कोणत्याही क्षेत्रात गेले तरी त्यातूनही सेवा घडणार असतेच. त्यातूनही पैसा मिळू शकतो. पण आपल्याकडे कलेला फारशी प्रतिष्ठा नाही.


परवा
मित्रांकडे सहजतेने बसलो
होतो. त्याचे अत्यंत गोड,गोंडस आणि
अवघ्या सात आठ वर्षाचे मुल स्नेहसंमेलनाची
तयारी करत होते.. शाळेत स्नेहसंमेलनाचे वातावरण
सुरू झाले होते.त्यामुळे मुलं घरी देखील काही करू पाहत
असतात.. पण त्याची नृत्याची तयारी पाहून आई त्याला म्हणाली
" जरा, अभ्यास कर... नाचून काही मिळणार नाही.नाचन्यापेक्षा
अभ्यासाकडे लक्ष दे. नाचणे वगैरे याचा काही उपयोग नाही
जीवनात.. उपाशी मरावे लागेल..तुला बापासारखे डॉक्टर
व्हायचे आहे हे लक्षात घे.." आता तर मलाही प्रश्न पडला
होता. मुलाचे वय अवघ ८ वर्षाचे आहे. या वयात त्याला
कुठे आपले जीवन कळणार आहे..? त्याला तर
फक्त जेथे आनंद मिळेल अशा...

कलेचा विचार म्हणजे जणू काही भिकारपणाचे लक्षण आहे. आपण सिनमा, नाटक पाहातो तेव्हा आपल्याला त्यातील कलाकांराचे मोठेपण वाटतेही. पण आपली मुलं कलेच्या दिशेने जाऊ नये.. त्यात करीअरचा विचार करू नये असेही पालकांना आतून वाटत असते. हिंदी सिनेमा सृष्टीतील विशिष्ट घरे आजही कलेला वाहून घेतलेली आहेत.तेथे मोठी स्पर्धा आहे.. पण सामान्य माणसांच्या मनात आजही कलेबददल प्रेम असले तरी व्यावसायिक अंगाने त्याकडे पाहण्याची दृष्टी नाही हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे कलेचा विचार उच्चतम पातळीवर केला जात नाही हेही वास्तव आहे. आपल्या मुलांने कला शिकावी पण ती उदरनिर्वाहाच्या दृष्टीने नाही तर केवळ छंद म्हणून..

समाजात विशिष्ट प्रकारच्या नोकरीला अधिकाधिक प्रतिष्ठा आहे. समाजमनात सरकारी सेवेबददल अधिक आकर्षण आणि प्रतिष्ठा आहे. त्याचवेळी डॉक्टर, वकील यापेशांबददलही मोठी प्रतिष्ठा आहे. साधारणपणे ज्याला प्रतिष्ठा आहे त्या दिशेनेच विद्यार्थ्यांनी प्रवास सुरू ठेवावा अशी साधारण पालकांची अपेक्षा असते.आपल्या मुलाने काय व्हावे ही घरातील मोठे माणसं ठरवत असतात. मुलांचा भविष्याचा पाया तेच पालक घालत असतात.. मग त्या पायासाठी मुलांच्या मनाची तयारी, त्यासाठीची कौशल्य, क्षमता आहेत की नाही याचा विचार करायला हवा असतो. पण येथे तर पालकच ठरवतात.. कारण त्यांना मुलाच्या आनंदापेक्षा पैशातील सुख महत्वाचे वाटत असते. बालकांच्या आयुष्याचे यश फक्त पैसे मिळवण्यात नसते.पैसा हे जीवनाचे सर्वस्व नाही. त्यामुळे पालक म्हणून आपण बालकांचा आनंद की श्रीमंतीची वाट यातील नेमकी निवड कशाची करायची याचा विचार करायला हवा आहे. साधारणपणे मुलांच्या अंगी अनके कौशल्य असतात.त्याच बरोबर विविध क्षमता देखील असतात. त्यांचा विचार न करता आपण शिक्षणाचा विचार नेमका कोणत्या दिशेने करतो आहोत याचा विचार करण्याच वेळ आली आहे. देशात दरवर्षी हजारो विद्यार्थी आत्महत्या करतात. नुकतेच केंद्र सरकारने देशातील उच्च शिक्षणातील गळतीबददलची आकडेवारी जाहीर केली आहे. विशेषता उच्च शिक्षण क्षेत्रातील नामांकित संस्थामधील होणारी गळती अधिक चिंताजनक आहे. यातील सर्वच विद्यार्थी केवळ गरीबी म्हणून शिक्षण सोडता आहेत असे नाही. त्यामागे मुलांना आपल्याला आवडणारे मनपंसत अभ्यासक्रम नसणे हे देखील कारण असणार आहे. कोटा या ठिकाणी गेले सहा महिन्यात चाळीसच्या आसपास विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची बाब समोर आली तेव्हा मुलांची होणारी घुसमट ही अधिक चिंताजनक आहे. असं असताना पालकांच्या अपेक्षा आणि वर्तमानातील शिक्षणाचा बदलत चाललेला अर्थ, शिक्षण व्यक्तिमत्व विकासापेक्षा ते अधिक उपजीवेकाचा भाग बनत चालले आहे. त्यामुळे जे शिक्षण आनंददायी आहे ते शिक्षणच निराशेच्या छायेत दडलेले आहे. ही निराशा अधिक चिंता करायला लावणारी आहे.त्यादृष्टीने आपण विचार करायला हवा. शेवटी जीवन जगायचे असेल तर पैसा हवा.. पण त्यापेक्षा अधिक आनंद देखील मिळायला हवा..याचाही विचार करायला हवा. पालकांनी आपल्या पाल्याचा कल, अभिरूची, बुध्दिमत्ता, क्षमता, कौशल्य यांचा विचार करून त्याला त्याच्या आवडीच्या क्षेत्रात प्रवास घडवायला हवा. तसे घडले तरच जीवनाची नवी वाट चालण्याचा आनंद पाल्यात भरला जाण्याची शक्यता आहे. मुलांनी काय करावे यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी मदत करावी.. आपण मुलांचे मालक नाही तर पालक होण्याची गरज आहे.. आज आपण मालक झालेलो आहोत ही अधिक चिंताजनक गोष्ट आहे.. त्यावर मात करण्यासाठी पालक आणि शिक्षकांनी अधिक प्रयत्न करायला हवेत... अर्थात ही वाट कठीण आहे हे लक्षात घ्यायला हवे.

• • •





# बाळासाहेब ठाकरेंनाही भारतरत्न द्या - राज ठाकरे



**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारकडे शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, अशी मागणी केली आहे. राज ठाकरे यांनी ट्विट करत याबाबतची मागणी केली आहे. केंद्र सरकारने तीन दिग्गजांना आज भारतरत्न पुरस्कार घोषित केला आहे. यामध्ये माजी पंतप्रधान आणि काँग्रेस नेते नरसिंह राव, चौधरी चरण सिंग आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि हरित क्रांतीचे जनक एमएस स्वामीनाथन यांचा समावेश आहे. यानंतर आता राज ठाकरे यांनी केंद्र सरकारकडे बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी केली आहे. "माजी पंतप्रधान स्व. पी.व्ही. नरसिंहराव, स्व. चौधरी चरण सिंग आणि भारतीय हरित क्रांतीचे जनक एस.स्वामिनाथन ह्यांना भारतरत्न सन्मान घोषित करण्यात आला. ह्या यादीतले एस.स्वामिनाथन ह्यांचं अवघ्या काही महिन्यांपूर्वी निधन झालं. इतकी अफाट कामगिरी करणाऱ्या शास्त्रज्ञाला त्यांच्या हयातीत हा बहुमान मिळायला हवा होता", अशी भावना राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

"पी.व्ही नरसिंहराव आणि चौधरी चरण सिंग ह्यांना आणि काही वर्षांपूर्वी प्रणब मुखर्जींना भारतरत्न सन्मान घोषित करून, केंद्रातील भारतीय जनता पक्ष प्रणित सरकारने राजकीय औदार्य दाखवलंच आहे तर मग हेच औदार्य त्यांनी हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे ह्यांना देखील भारतरत्न घोषित करून दाखवायलाच हवं. देशातील प्रख्यात व्यंगचित्रकार आणि देशभरातील तमाम हिंदूंची अस्मिता जागृत करणाऱ्या अद्वितीय नेत्याला हा सन्मान मिळायलाच हवा. स्व. बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा ज्यांच्याकडे आलाय अशा माझ्यासारख्या अनेकांसाठी तो अत्यानंदाचा क्षण असेल", असं मत राज ठाकरे यांनी व्यक्त केलं आहे.

दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्द्यावरुन केंद्र सरकारवर ट्विटच्या माध्यमातून निशाणा साधला आहे. "हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या मोदी सरकारला पुन्हा एकदा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विस्मरण झाले. आधी २ आणि आता एकदम ३ असे एका महिन्यात ५ नेत्यांना भारतरत्नने सन्मानित करण्यात आले. पण त्यात ना वीर सावरकर ना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे", असं संजय राऊत म्हणाले. "खरं तर नियम असा आहे की एका वर्षात जास्तीत जास्त ३ भारतरत्न देता येतात. मोदी यांनी एका महिन्यात ५ जणांना भारतरत्न जाहीर केले. निवडणुकांची धामधूम. दुसरे काय?", अशी टीका राऊतांनी केली.

"कर्पुरी ठाकूर आणि लालकृष्ण अडवानी यांच्या मागोमाग आता चौधरी चरण सिंग, पी वी नरसिंहराव आणि एम एस स्वामिनाथन यांना भाररत्नने सन्मानित केले. आणखी काही नेते प्रतीक्षेत आहेत. पण बाळासाहेब ठाकरे यांचे विस्मरण का? ज्यांनी सारा भारत हिंदुमय केला, ज्यांच्यामुळे मोदी अयोध्येत राममंदिर सोहोळा करू शकले", असं संजय राऊत म्हणाले आहेत.

## शेतकरी कर्जमाफी यादीबाबत १५ फेब्रुवारीपर्यंत हरकती पाठवा



**रत्नागिरी** : जिल्ह्यातील माहे फेब्रुवारी व मार्च २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित शेतकऱ्यांना ३ महिन्याची व्याजमाफी सन २०१५-१६ या वर्षातील पीक कर्जाचे रुपांतरित कर्जावरील सन २०१५-१६ या वर्षाचे संपूर्ण व्याज व पुढील चार वर्षांचे ६% दराने व्याज शासनामार्फत अदा करण्याबाबत बँकांकडील प्राप्त प्रस्तावानुसार पात्र / अपात्र शेतकऱ्यांची यादी बँका, संबंधित तालुका सहायक निबंधक सहकारी संस्था, तलाठी सजा व ग्रामपंचायतींमध्ये प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना काही हरकती, सूचना असल्यास १५ फेब्रुवारीपर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी केले आहे.

बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा,आय.डी.एफ.सी.बँक, आय.सी.आय.सी.आय.बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, अलाहाबाद बँक, आंध्रा बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, इंडियन बँक, इंडियन ओवरसिज बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडीकेट बँक, विदर्भ कोकण ग्रामीण बँकांचा समावेश आहे.

खातेधारकांच्या हरकती / सूचना असल्यास त्या संबंधित बँकेमध्ये दि. १५ फेब्रुवारीपर्यंत करावयाच्या आहेत. त्यांनतर आलेल्या हरकती / सूचनांचा विचार केला जाणार नाही, असे ही कळविले आहे.

## राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त मोहीम



**रत्नागिरी** : मंगळवार दि. १३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन असल्याने राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय जंतनाशक मोहीम कार्य दल समितीची सभा काल झाली.

बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द आठल्ये, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भास्कर जगताप, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संघमित्रा फुले आदी उपस्थित होते.

मुलांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. या मोहिमेचे १ ते ६ वर्षे वयोगटातील सर्व बालके, पाहिली ते बारावीतील शाळेत जाणारी सर्व मुले-मुली तसेच ६ ते १९ वर्षे वयोगटातील शाळेत न जाणारी सर्व मुले-मुली लाभार्थी असणार आहेत. ज्या मुला-मुलींना १३ फेब्रुवारी रोजी जंतनाशक गोळी दिली नसेल, त्यांना २० फेब्रुवारी रोजीच्या मॉप-अप दिनी गोळी देण्यात येणार आहे.

## शिंदे गटाच्या याचिकेवर १५ फेब्रुवारीला सुनावणी



**मुंबई** : खरी शिवसेना ही शिंदे गटाची असल्याचा निर्वाळा देताना शिवसेना ठाकरे गटाच्या १४ आमदारांना पात्र ठरविण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आली आहे. शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने १५ फेब्रुवारीला सुनावणी निश्चित केली आहे.

शिवसेना पक्ष कोणाचा, यासह ठाकरे व शिंदे गटाच्या आमदारांच्या पात्रता-अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निर्णय देताना शिवसेनेवर शिंदे गटाने केलेला दावा योग्य ठरविला. तसेच शिंदे आणि ठाकरे गटाचे सर्व आमदार पात्र असल्याचाही निर्वाळा दिला. अध्यक्षांच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेच्या मागील सुनावणीवेळी दखल घेऊन खंडपीठाने शिवसेना ठाकरे गटाच्या १४ आमदारांसह विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावत ८ फेब्रुवारीपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

मात्र गुरुवारी वेळेअभावी या याचिकेवर सुनावणी होऊ शकली नसल्याने शुक्रवारी ॲड. अनिल सिंग यांनी ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देत तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली. न्यायालयाने याचिकेची सुनावणी १५ फेब्रुवारीला निश्चित केली आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव



**ठाणे** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी वाढदिवस साधेपणाने साजरा करावा असे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून राज्यभर आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, दिव्यांगाना उपयुक्त सामुग्रीचे वाटप यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्यपाल रमेश बैस, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री, तसेच राज्याच्या मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी शुभेच्छा देवून अभिष्टचिंतन केले.

ठाणे शहरातील 'स्वयम' या बहुविकलांग मुलांच्या पुनर्वसन केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमाला उपस्थित राहून या मुलांचा उत्साह वाढवला. माझ्या वाढदिवसानिमित्त या मुलांनी माझे मनापासून स्वागत केले तसेच खास केकही कापला.

आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व शर्मा यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री तसेच मंत्र्यांनीही मुख्यमंत्र्यांना दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. श्री श्री रविशंकर, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यासह विविध क्षेत्रातील उद्योजक, संपादक, पत्रकार तसेच शिक्षण, सहकार, सामाजिक कार्यकर्ते आदींनीही ई-मेल, दूरध्वनी, संदेश यांच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. समाजमाध्यमांवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर शुभेच्छा देण्याचा ओघ सुरुच होता. अबाल-ज्येष्ठांपासून अनेकांनी मुख्यमंत्री शिंदे यांना प्रत्यक्ष भेटूनही शुभेच्छा दिल्या. यात राजकीय, सामाजिक संस्था तसेच विविध संघटना आणि कला, नाट्य, चित्रपट क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि प्रशासनातील अधिकारी आदींचा समावेश होता.

ठाणे शहरातील 'स्वयम' या बहुविकलांग मुलांच्या पुनर्वसन केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमाला उपस्थित राहून या मुलांचा उत्साह वाढवला. माझ्या वाढदिवसानिमित्त या मुलांनी माझे मनापासून स्वागत केले तसेच खास केकही कापला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शुभेच्छा देण्यासाठी आज सकाळी त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी परिसरातील शालेय मुला-मुलींचीही गर्दी झाली होती. मुख्यमंत्री शिंदे यांना मध्यरात्रीपासूनच विविध माध्यमातून शुभेच्छा देण्यात येत होत्या. मुख्यमंत्र्यांनी कोणताही सार्वजनिक डामडौल न करता अत्यंत साधेपणाने कुटुंबियांसमवेत वाढदिवस साजरा केला. देश आणि विदेशातूनही मुख्यमंत्री शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे संदेश, समाजमाध्यमावरून शुभेच्छा देणारी छायाचित्रे, ध्वनीचित्रफिती प्रसारीत केल्या गेल्या. मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाणे येथील निवासस्थानी, आनंदाश्रम, टेंभी नाका, वर्षा शासकीय निवासस्थानी शुभेच्छा स्वीकारल्या. दरम्यान, वाढदिवस साधेपणाने साजरा करतानाच विविध समाजोपयोगी उपक्रम म्हणून वृक्षारोपणासह, स्वच्छता आणि अशा अनेकविध मोहिमांचे आयोजन करण्यात आले होते.

## जगातील सामर्थ्यवान देश म्हणून भारताचा देशवासीयांना अभिमान -आ. प्रशांत ठाकूर



**पनवेल** : भाजपतर्फे व्यापक जनसंपर्कासाठी 'गाव चलो अभियान' सुरू झाले आहे. यात भाजपचे सर्व वरिष्ठ नेते तसेच प्रदेश पदाधिकारी, खासदार, आमदार त्यांना दिलेल्या गावात एक दिवस मुक्कामी राहणार आहेत. त्या अनुषंगाने मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेरे येथे मुक्काम करत समाजातील विविध घटकांशी संवाद साधला. यावेळी विचारांची देवाणघेवाण होत त्यांच्या या अभियानाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सरकारी योजनेतील लाभार्थी, शाळा, पोस्ट ऑफिस, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी, बचत गट, धार्मिक स्थळांना भेट, नैपुण्य प्राप्त विद्यार्थी व खेळाडू, ज्येष्ठ कार्यकर्ते, नवमतदार, बूथ कमिटी, समाज क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तिमत्व अशा सर्वांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. विद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, महिला बचत गट, ग्रामपंचायत कार्यालय यांना सदिच्छा भेट पाहणी केली तसेच या महत्वाच्या गरजांना कायम सहकार्य करण्याचे त्यांनी आश्वासित केले. यावेळी नवमतदार, ज्येष्ठ कार्यकर्ते समाजातील प्रतिभावंत व्यक्ती तसेच खेळाडूंचीही त्यांनी भेट घेतली व त्यांचा सत्कारही केला. तसेच गावात फिरून त्यांनी लोकांशी संवाद केला त्यांना मोदी सरकारच्या कार्याची माहिती दिली. यावेळी उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्या कुटुंबीयांचा, कुस्तीपटू वरुण पाटील व पैलवान शंकर जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य विषयक व सुविधांबाबत डॉक्टरांशी चर्चा झाली.

यावेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी सरपंच वासुदेव गवते, माजी पंचायत समिती सदस्य राज पाटील, सरपंच प्रकाश गडगे, उपसरपंच वंदना रोड पालकर, राम पाटील, दिनेश मानकामे, शैलेश जाधव, माजी उपसरपंच नीलिमा पाटील, कल्पना वाघे, डॉ. रोशन पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष सागर पाटील, सुभाष पाटील, मेघनाथ पाटील, बूथ अध्यक्ष सुनील पाटील, अमित गवते, किरण मानकामे, रामदास पाटील, गोपाल रोडपालकर, माजी ग्रामपंचायत सदस्य सुवर्णा मगर, सावित्री पाटील, मिलिंद पाटील, विक्रांत मस्कर, रोहन पाटील, शाळेचे मुख्याध्यापक धोत्रे सर शाळा कमिटी सदस्य राजन पाटील, संगीता जोशी, सुनंदा कलोते, किशोर खारके, सतीश घाडगे, मयूर पाटील, विकास पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे १० वर्षातील प्रभावी कार्य, जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्ती, विकसित भारताचा संकल्प सांगणाऱ्या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती या 'गाव चलो अभियान' मधून लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात आले. मोदी सरकारच्या योजना व उल्लेखनीय कामगिरीची माहिती देणारी पत्रकेही यावेळी वितरित करत लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्यात आली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लाभार्थींची भेट घेत त्यांना मिळालेल्या योजनांची माहिती घेतली तर केवायसी व इतर तांत्रिक कारणामुळे लाभ न घेऊ शकलेल्या नागरिकांनी त्याची पूर्तता करून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## जन्म-मृत्यूची शंभर टक्के नोंदणी करावी - जिल्हाधिकारी

**रत्नागिरी** : ग्रामसेवकांनी जन्म-मृत्यूची १०० टक्के नोंदणी crsorgi.gov.in या पोर्टलवर करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी दिली. जन्म-मृत्यू नोंदणीविषयक जिल्हास्तर समन्वय समितीची सभा आज झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द आठल्ये, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर जगताप, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संघमित्रा फुले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीकांत खवळे आददी उपस्थित होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आठल्ये यांनी संगणकीय सादरीकरण करुन माहिती दिली. जिल्हाधिकारी श्री. सिंह म्हणाले, जन्ममृत्यू नोंदणीकरिता मॅन्यूअल पध्दतीचा अवलंब न करता केंद्र शासनाच्या सीआरएस ऑनलाईन पोर्टलचा वापर करावा. याबाबत गटविकास अधिकारी, ग्रामविस्तार अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घ्यावी.

## माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांना शोकाकुल वातावरणात साश्रू नयनांनी निरोप

**मुंबई** : मुंबई: शिवसेना उपनेते, माजी आमदार विनोद घोसाळकर यांचे पुत्र आणि माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची त्यांचे परिचित मॉरिस नोरोन्हा याने पूर्व वैमनस्यातून गुरुवारी रात्रीच्या सुमारास त्याच्या कार्यालयात गोळ्या झाडून हत्या केली. त्यानंतर मॉरिस याने स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केली. या दुर्दैवी घटनेमुळे बोरिवली, दहिसर परिसरात खळबळ उडाली आणि वातावरण तणावपूर्ण झाले होते.

दरम्यान, शुक्रवारी सकाळपासून अभिषेक यांचे पार्थिव निवासस्थानी दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, रश्मी, आदित्य ठाकरे, शिवसेना नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते आदींनी शेकडोच्या संख्येने उपस्थित राहून अंतिम दर्शन घेतले. दुपारी ४.३० वाजता त्यांच्या पार्थिवावर दौलत नगर स्मशानभूमी येथे शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

यावेळी, आपल्या लाडक्या लोकप्रतिनिधीला निरोप देण्यासाठी अभिषेक घोसाळकर यांचे हितचिंतक, पदाधिकारी, कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी आदींनी मोठ्या संख्येने घराजवळ, अंत्ययात्रेत आणि रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. पोलिसांनी घरापासून ते स्मशानभूमीपर्यंत चोख बंदोबस्त ठेवला होता. अंत्ययात्रा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी घोसाळकर यांच्या घरापासून ते स्मशानभूमीपर्यंत रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. "अमर रहे अमर रहे, अभिषेक भाई अमर रहे", " जब तक सूरज चांद रहेगा , अभिषेक तेरा नाम रहेगा", अशा घोषणा देत भावपूर्ण वातावरणात, साश्रू नयनांनी अभिषेक घोसाळकर यांना अखेरचा निरोप देण्यात आला.



तत्पूर्वी, शिवसेनेचे पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, माजी मंत्री व आमदार आदित्य ठाकरे, नेते संजय राऊत, खासदार विनायक राऊत, खासदार राजन विचारे, आमदार अनिल परब, आमदार विलास पोतनीस, आमदार सुनील प्रभू, नेते व माजी मंत्री सुभाष देसाई, भाजपचे आमदार प्रवीण दरेकर, पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, काँग्रेस आमदार भाई जगताप, माजी नगरसेवक व विभागप्रमुख तुकाराम पाटील, माजी नगरसेवक हर्षद कारकर, बाळकृष्ण ब्रीद यांनी घोसाळकर यांच्या बोरिवली येथील निवासस्थानी भेट देवून घोसाळकर कुटुंबीयांचे सांत्वन केले व अभिषेक यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले.

अभिषेक यांचा पार्थिव अंतिम संस्काराला स्मशानात नेण्यापूर्वी त्यांच्या "औदुंबर"या निवासस्थानी अंतिम दर्शनासाठी ठेवला होता. यावेळी, अभिषेक या आपल्या लाडक्या पुत्राला निरोप देताना पिता विनोद घोसाळकर हे घरात, बाहेर अगदी स्मशानातही ढसाढसा रडले. काही केल्या त्यांचे अश्रू त्यांना आवरणे कठीण झाले होते. अशीच काहीशी अवस्था अभिषेक यांच्या आई व पत्नी तेजस्विनी आणि त्यांची मुलगी यांची झाली होती. त्याचप्रमाणे, शोकाकुल व नीरव शांततापूर्ण वातावरणात अभिषेक यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी त्यांचे नातेवाईक, शिवसेना पक्षाचे नेते, लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुणी यांनाही आपल्या डोळ्यातील अश्रू आवरता आले नाहीत. घोसाळकर यांच्या निवासस्थानी जणू काही अश्रूंचा बांध फुटला होता.

विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, खासदार अनिल देसाई, आमदार सुनील शिंदे, रमेश कोरगावकर, प्रकाश फातरपेकर, काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड,माजी गटनेत्या राखी जाधव, युवा सेनेचे वरुण सरदेसाई, अमोल कीर्तिकर, अंकित प्रभू, माजी नगरसेवक संजय घाडी, माजी सभगृह नेत्या विशाखा राऊत, माजी नगरसेवक संजना घाडी, सदानंद परब, विभाग प्रमुख उदेश पाटेकर, सुजाता शिंगाडे, शीतल शेठ-देवरुखकर, माजी नगरसेवक मिलिंद वैद्य, उपनेते विश्वनाथ नेरुरकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी-शिवसैनिक आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# “द ग्रॅण्ड सेंट्रल पार्क” ओळखले जाणार “नमो- द ग्रॅण्ड सेंट्रल पार्क” नावाने - मुख्यमंत्री

**ठाणे :** आजच्या धकाधकीच्या जीवनात अतिशय महत्त्वाची ठरेल, अशी ग्रॅण्ड सेंट्रल पार्क ही संकल्पना ठाण्यात प्रथमच साकारली आहे. हे उद्यान आबालवृद्धाना आनंद देणारे ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी ठाण्यात केले. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते ठाणे महानगरपालिकेच्या आणि कल्पतरू समूहाने विकसित केलेल्या ग्रॅण्ड सेंट्रल पार्कचे लोकार्पण संपन्न झाले. हे “द ग्रँड सेंट्रल पार्क” आता “ नमो- द ग्रँड सेंट्रल पार्क” या नावाने ओळखले जाईल, असे त्यांनी जाहीर केले.

आमदार संजय केळकर यांनी सुचविल्याप्रमाणे या उद्यानाला, जगभरात ज्यांनी देशाचा नावलौकिक वाढवला आहे, असे आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव देण्यात येईल. त्यामुळे या उद्यानाची ओळख ‘नमो द ग्रॅण्ड सेंट्रल पार्क’ अशी होईल, असे मुख्यमंत्री महोदयांनी लोकार्पण सोहळ्यात जाहीर केले.

ठाणे महापालिका क्षेत्रात कोलशेत भागात २०.५ एकर जागेवर साकारलेल्या ग्रॅण्ड सेंट्रल पार्कच्या



लोकार्पण सोहळ्यास शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, आमदार संजय केळकर, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, एच. एस. पाटील, मिनाक्षी शिंदे, माजी उपमहापौर पल्लवी कदम, माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर, माजी नगरसेवक संजय वाघुले, संदीप लेले, उषा भोईर, भूषण भोईर, सिद्धार्थ ओवळेकर, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त मिताली संचेती, कल्पतरू डेव्हल्पर्सचे मोफतराज मुनोत आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी संपूर्ण उद्यानाची पाहणी केली. त्यातील संकल्पनेवर आधारित विविध देशांची उद्याने, लहान मुलांसाठी असलेली खेळणी, जागा यांची पाहणी केली. क्यू आर कोड स्कॅन करून झाडाविषयी माहितीही जाणून घेतली.

राज्यातील हे सगळ्यात मोठे उद्यान आहे. त्याचा उभारणीत कुठेही गुणवत्तेशी तडजोड केलेली नाही. सुमारे ३ हजार ५०० झाडे या उद्यानात आहेत. आणखी झाडांचे नियोजन करावे. तसेच, त्याचे व्यवस्थापनही नेटकेपणाने व्हावे. कल्पतरू डेव्हल्पर्सने टीडीआरच्या माध्यमातून हे उभे केले आहे. महापालिकेचा एकही पैसा खर्च न करता हे भव्य दिव्य उद्यान उभे राहिले आहे, असेही मुख्यमंत्री महोदय म्हणाले.

अर्बन फॉरेस्ट करसे असू शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे. हे ऑक्सिजन पार्क आहे. कांरजे, तलाव यांचा अनुभव सगळ्यांना घेता येईल. त्याच जोडीने मिनिएचर पार्क उभे करण्यात येणार आहे. त्यात जगभरातील आश्चर्यांच्या मोठ्या प्रतिकृती येथे पाहता येतील. सगळ्यांनाच परदेशात जाता येत नाही. त्यामुळे त्यांनाही तो आनंद या मिनिएचर पार्कमध्ये घेता येईल, असेही मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले.

सेंट्रल पार्क भव्य दिव्य झाले असून हे उत्तम पर्यटन स्थळ होईल, असा विश्वास याप्रसंगी आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला. तसेच, या उद्यानाचे नामकरण नमो ग्रॅण्ड सेंट्रल पार्क असे करावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

# शाहीर शाहिद खेरटकर यांना विश्व समता कला-भुषण पुरस्कार जाहीर



**चिपळूण :** गेली १८ वर्षे अविरतपणे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, धार्मिक, कला ,क्रीडा, जल,पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या विश्व समता कलामंच लोवले,संगमेश्वर या संस्थेच्या वतीने देण्यात येणारे राज्यस्तरीय विश्व समता पुरस्कार जाहीर करण्यात आले असून सदर पुरस्कार वितरण समारंभ शनिवार दि.१० फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ७.०० वा.शुभगंधा मंगल कार्यालय मयुरबाग लोवले ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी येथे मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये संपन्न होणार आहे.

यावर्षी राज्यस्तरीय विश्व समता “कलाभूषण पुरस्कारासाठी” कोकण प्रांतातील एक प्रतिभावंत आणि आपल्या काव्य,गायन आणि वक्तृत्वातून समतेचा विचार पेरणारे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व शाहीर शाहिद खेरटकर यांची निवड झाली आहे.शाहीर शाहिद खेरटकर हे गेली २५ वर्षे कलाविश्वाला परिचित आहेत.त्यांनी कोकणची समृद्ध लोककला जाखडी (कलगी तुरा)या लोककलेच्या माध्यमातून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.जात धर्माच्या पलीकडे जाऊन एक मानवतावादी कलाकार म्हणून त्यांनी स्वतःला सिद्ध केलं आहे.त्यांची लेखणी नेहमीच छत्रपती शिवराय,शाहू फुले,आंबेडकर यांच्या विचारांनी फुलताना दिसते.ते एक शाहीर आहेतच त्याबरोबर ते उत्कृष्ट कवी,निवेदक,वक्ता आणि एक जाणकार पत्रकार म्हणून देखील प्रख्यात आहेत.आजवर त्यांनी शेकडो कार्यक्रम कोकण प्रांतात तसेच मुंबई पुण्याच्या विविध नाट्यगृहांच्या रंगमंचावर सादर केले आहेत.अनेक राज्यस्तरीय साहित्य संमेलनात कवी म्हणून त्यांनी आपली छाप सोडली आहे,तसेच विविध विषयांवर त्यांनी महाराष्ट्रभरातून व्याख्याने देखील दिली आहेत.त्यांचा “ललकारी” हा कविता संग्रह थोड्याच दिवसात प्रकाशित होत आहे,ज्यामध्ये त्यांनी आपल्या विचारांची नेमकेपणाने पेरणी केली आहे.अशा या हरहुन्नरी कलाकाराला “विश्व समता कलाभुषण पुरस्कार” जाहीर झाल्याने सर्व स्तरातून समाधान व्यक्त होत आहे आणि कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जूनपासून इंजिनिअरिंग, मेडिकलसह ६०० अभ्यासक्रम मुलींसाठी मोफत



**मुंबई :** इंजिनिअरिंग, मेडिकलसह ६०० अभ्यासक्रमांचे शिक्षण मोफत मिळणार आहे. ज्या मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थिनींना याचा लाभ मिळणार आहे.

राज्यातील मुलींसाठी खुशखबर असून इंजिनिअरिंग, मेडिकलसह ६०० अभ्यासक्रमांचे शिक्षण मोफत मिळणार आहे. ज्या मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थिनींना याचा लाभ मिळणार आहे. यंदाच्या जून महिन्यापासून याची अंलबजावणी सुरू केली जाणार आहे. राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकात पाटील यांनी ही घोषणा केली आहे.

जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विविध नवीन इमारतींच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात बोलताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली. म्हटले की, मुलींना मेडिकल, इंजिनिअरिंग अशा वेगवेगळ्या तब्बल ६०० हून अधिक अभ्यासक्रमांना मोफत शिक्षण दिले जाईल.

इंजिनिअरिंग, मेडिकल सारख्या अभ्यासक्रमांना लाखो रुपये खर्च होतात. यामुळे सामान्य कुटूंबातील मुले उच्च व तंत्र शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यात या योजनेमुळे मुलींसाठी उच्च शिक्षणाची दारे उघडणार आहेत.

८ लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागास वर्ग तसेच, आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील मुलींच्या सर्व अभ्यासक्रमाची १०० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येणार आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात अधिकाधिक मुलींचे प्रवेश होतील, यासाठी विशेष अभियान राबवण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.

या कार्यक्रमानंतर मुलांमध्ये नाराजी पसरली. मंत्री चंद्रकांत पाटील व्यासपीठावरून बाहेर पडत असताना तरुणांनी त्यांना अडवत केवळ मुलींना सवलत देण्यात आली तसेच कमी उत्पन्न गटातील मुलांनाही मोफत शिक्षणाची तरतूद करण्याची मागणी केली आहे. यावर तुमची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन पाटील यांनी केली.

# “महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार” राज्यात कोकण विभाग प्रथम क्रमांकावर

## कोकण विभागाने पटकाविले एकूण ५३ पैकी २० पुरस्कार




ठाणे : पुणे-वाकड येथील हॉटेल खमी टिपटॉप येथे आयोजित “महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्काराचे वितरण तसेच देशातील २४ तज्ज्ञ संस्थांसोबत सामंजस्य करार” या कार्यक्रमात राज्यातील एकूण ५३ उद्योग घटकांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते राज्य निर्यात पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यात ५३ पैकी २० पुरस्कार पटकावून संपूर्ण राज्यात कोकण विभागाने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

कोकण विभागातील उद्योग समूहांना ठाणे-६ (मे. अपर इंडस्ट्रिज लि., मे. कनेक्टवेल इंडस्ट्रिज प्रा.लि., मे.ज्योती स्टील इंडस्ट्रिज, मे. कविश फॅशन प्रा.लि., मे. सचिन्स इम्पेक्स, मे. दलाल प्लास्टिक प्रा.लि.), रत्नागिरी-६ (मे. जिलानी मरीन प्रोडक्ट, मे. कृष्णा अॅन्टी ऑक्सिडन्टस प्रा.लि., मे. अल्काय केमिकल्स प्रा.लि., मे. गद्रे मरीन एक्स्पोर्ट प्रा.लि., मे. एम.के.ए. इंजिनियर्स अॅण्ड एक्स्पोर्टर्स प्रा.लि., मे. सुप्रिया लाईफ सायन्स लि.), रायगड-४ (मे.नाईक ओशियन एक्सपोर्टस प्रा.लि., मे. कपूर ग्लास इंडिया प्रा.लि., मे. गंधार ऑईल रिफायनरी (इंडिया) लि., मे. एचकेएस इम्पेक्स, प्रा.लि.), पालघर-३ (मे. खोसला प्रोफिल प्रा.लि., मे. बिक केमिकल्स अॅण्ड पॅकेजिंग प्रा.लि., मे. ईस्टमन केमिकल), सिंधुदूर्ग-१( मे. अमृता कॅश्यू इंडस्ट्रिज) असे मिळून एकूण २० निर्यात पुरस्कार मिळाले.

यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अपर उद्योग आयुक्त प्रकाश वायचळ, अपर उद्योग संचालक संजय कोरबु, उद्योग सहसंचालक शैलेश रजपूत, कोकण विभागाच्या उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

# रुळांमध्ये अडकलेल्या चाकरमान्याला वाचवण्यासाठी मुंबईकरांनी ढकलली लोकल ट्रेन

**नवी मुंबई :** मुंबईतील वाशी स्थानकावरील एक व्हिडिओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. या व्हिडिओत मुंबईकरांनी रुळांमध्ये अडकलेल्या चाकरमान्याला वाचवण्यासाठी चक्क लोकल ट्रेन ढकलली. एका प्रवाशाने हा संपूर्ण प्रकार त्याच्या मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद केला आहे. या

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेला हा व्हिडिओ ४१ सेंकदाचा आहे. या व्हिडिओमध्ये अनेक प्रवासी लोकल मोटरमनच्या केबिनभोवती जमताना दिसत आहेत. तर, काहीजण लोड केलेल्या ट्रेनच्या डब्याला दुसऱ्या बाजूला ढकलताना आणि खाली अडकलेल्या व्यक्तीला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत.

Reddit वर व्हिडिओ पोस्ट करणाऱ्या युजरने दावा केला आहे की तो स्वतः या घटनेचा साक्षीदार आहे. पनवेलला जाणाऱ्या लोकल ट्रेनखाली एक प्रवासी पडून अडकल्याचे त्याने सांगितले. “जेव्हा मी व्हिडिओ रेकॉर्ड करत होतो, तेव्हा लोक ट्रेनला धक्का देत होते. नंतर सर्वांनी सहकार्य केले आणि एकाच वेळी ट्रेन ढकलली आणि संबंधित प्रवाशाला बाहेर येण्यास मदत केली.”

वापरकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत रुळांमध्ये अडकलेल्या व्यक्तीला किरकोळ दुखापत झाली आहे. या व्यक्तीच्या घोट्याला सूज आली आहे. पण सध्या तो ठिक आहे. कदाचित हा व्हिडिओ पाहून तुम्हालाही आश्चर्य वाटेल, परंतु या व्हिडिओमध्ये हे दिसून येते की जर आपण एकत्र काही केले तर त्यात आपल्याला नक्कीच यश मिळते.

# रत्नागिरी महासंस्कृती महोत्सवाचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन

**रत्नागिरी :** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व रत्नागिरी जिल्हा प्रशासन आयोजित येथील प्रमोद महाजन क्रीडा संकुलात ११ ते १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या रत्नागिरी महासंस्कृती महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सायंकाळी ६ वाजता होणार आहे. ५ दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचा लाभ जिल्हावासियांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी केले आहे.


उद्घाटन सोहळ्यास खासदार विनायक राऊत, खासदार सुनिल तटकरे, सर्वश्री आमदार निरंजन डावखरे, प्रसाद लाड, अनिकेत तटकरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, भास्कर जाधव, राजन साळवी, शेखर निकम, योगेश कदम उपस्थित राहणार आहेत.

११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता लेखन आणि संकल्पना अशोक




हांडे यांची असणारा मराठी बाणा कार्यक्रम होणार आहे. १२ फेब्रुवारी रोजी कोकण कला अकादमी प्रस्तृत प्रेरणा प्रोडक्शन निर्मित इतिहासाच्या पानावरचा एक सुवर्ण पान शिवबा हे महानाट्य होणार आहे. शाहीर नंदेश उमप आणि कलाकरांचा महाराष्ट्राची संस्कृती हा कार्यक्रम १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. शिवराज्यभिषेक आणि सांस्कृतिक परंपरा दर्शन घडवणारा रत्नकांत जगताप यांचा महाराष्ट्राची लोकधारा संगीत रजनी कार्यक्रम १४ फेब्रुवारी रोजी होणार आहे. तर १५ फेबुवारीला अवधुत गुप्ते संगीत रजनी कार्यक्रम होणार आहे.या पाचही दिवशी रोज सायंकाळी ६.३० ते ७ वा. या कालावधीत स्थानिक लोककला नमन, जाखडी, भजन, पालखी नृत्य होणार आहे. या सांस्कृतिक महोत्सवासाठी प्रवेश विनामुल्य असून, याचा जिल्हावासियांनी लाभ घ्यावा, त्याचबरोबर पर्यटन, कृषी, बचतगट, पुरातत्व विभागाचे दालने देखील असणार आहेत.

# लोकसभा निवडणुकीआधी देशात CAA कायदा लागू करणार- अमित शहा



**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याबाबत मोठी घोषणा केली आहे. लोकसभा निवडणुकीआधी देशात सीएए कायदा लागू करणार असल्याची मोठी घोषणा अमित शहांनी केली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी सीएए लागू करण्यासाठी अधिसूचना जारी केली जाईल आणि त्याची अंमलबजावणीही केली जाईल, असं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, CAA ची अंमलबजावणी कोणीही रोखू शकत नाही, असं वक्तव्य गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये पश्चिम बंगालच्या भेटीदरम्यान अमित शहांनी केलं होतं.

अमित शाह म्हणाले, “मी हे स्पष्ट करू इच्छितो की, CAA कोणत्याही व्यक्तीचे नागरिकत्व काढून घेणार नाही. या कायद्याचा उद्देश केवळ धार्मिक छळाचा सामना करत असलेल्या पाकिस्तानी, अफगाणिस्तानी आणि बांग्लादेशी अल्पसंख्याकांना नागरिकत्व देणं आहे.”

अमित शाह म्हणाले की, काँग्रेसनं शेजारील देशातील अत्याचारित अल्पसंख्याकांना नागरिकत्व देण्याचं आश्वासन दिलं आहे. ते म्हणाले की, “जेव्हा देशाची फाळणी झाली आणि तिथे अल्पसंख्याकांवर अत्याचार झाले, तेव्हा सर्वांना भारतात पळून यायचं होतं, तेव्हा काँग्रेसनं सांगितलं होतं की, तुम्ही इथे या, तुम्हाला इथलं नागरिकत्व दिलं जाईल.”

केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी विरोधकांवर मुस्लिमांची दिशाभूल केल्याचा आरोपही केला आहे. अमित शाह म्हणाले की, “सीएएबद्दल आमच्या मुस्लिम बांधवांची दिशाभूल केली जात आहे आणि त्यांना चिथवलं जात आहे. सीएए केवळ पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांग्लादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांना नागरिकत्व देण्यासाठी आहे.” पुढे बोलताना ते म्हणाले की, नरेंद्र मोदी सरकारनं लागू केलेल्या सीएएचं उद्दिष्ट ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चनांसह छळ झालेल्या गैर-मुस्लिम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व प्रदान करणं आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीबाबत बोलताना गृहमंत्री म्हणाले की, ही निवडणूक विकास विरुद्ध भ्रष्टाचाराची आहे. ही निवडणूक I.N.D.I.A विरुद्ध NDA बद्दल नाही. ही निवडणूक भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहिष्णुता विरुद्ध भ्रष्ट प्रशासना विरुद्ध आहे. ही निवडणूक ज्यांना राष्ट्रीय सुरक्षा मिळवायची आहे विरुद्ध जे परराष्ट्र धोरणाच्या नावाखाली राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणतात त्यांच्याबद्दल आहे. “ दरम्यान, डिसेंबर २०१९ मध्ये संसदेनं CAA मंजूर केला आणि त्यानंतर राष्ट्रपतींनीही CAA ला मंजूरी दिली. त्यानंतर या कायद्याला विरोध दर्शवत देशाच्या विविध भागांमध्ये निदर्शनं करण्यात आली होती.

# उद्योगांना चालना मिळण्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न करावेत - मुख्यमंत्री



**ठाणे :** महाराष्ट्रातील उद्योगांना चालना मिळण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथील हॉटेल टिप-टॉप प्लाझा येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी-४२ येथे बहुस्तरीय वाहनतळाच्या इमारतीचा भूमीपूजन समारंभ व “मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजनेचा” (मेडिक्लेम पॉलिसी) या कार्यक्रमाप्रसंगी केले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी-४२ येथे बहुस्तरीय वाहनतळाच्या इमारतीचा भूमीपूजन समारंभ व “मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजनेचा” (मेडिक्लेम पॉलिसी) शुभारंभ आज हॉटेल टिप-टॉप प्लाझा, लाल बहादूर शास्त्री मार्ग, रहेजा गार्डन समोर, ठाणे पश्चिम येथे संपन्न झाला. त्यावेळी या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, माजी आमदार रविंद्र फाटक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.बिपिन शर्मा, सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, विजय राठोड, एमआयटीएलचे एम.डी. श्री.मल्लिकनेर, स्थानिक पदाधिकारी आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, राज्यात उद्योगांना चालना मिळण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध पाहिजेत. राज्यात उद्योगांना गुंतवणूकीसाठी पोषक वातावरण आहे. आपल्या राज्यात जास्तीत जास्त उद्योग आले पाहिजेत, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. उद्योगांना सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. हे सरकार गतिमान सरकार आहे. आपण सर्वांनी गतिमानतेने कामे केली पाहिजेत. आज महाराष्ट्र एफडीआय मध्ये क्रमांक १ चे राज्य आहे. उद्योगांसाठी असलेली ध्येय-धोरणे सुटसुटीत असली पाहिजेत.

ते म्हणाले, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी-४२ येथे बहुस्तरीय वाहनतळ इमारतीमध्ये पार्किंग व्यवस्था वाढविली पाहिजे. एमआयडीतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या ८ ते १० च्या पाल्यांला दरवर्षी टॅबचे वाटप करण्यात येणार आहे. औद्योगिक विकास महामंडळातील ४५० अधिकारी, कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. औद्योगिक विकास महामंडळातील अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजनेचा” (मेडिक्लेम पॉलिसी) सुरु करण्यात आली असून हा एक चांगला उपक्रम एमआयडीसीने राबविला आहे.

राज्यात कॅशलेस आरोग्य सेवा पूर्ण राज्यभर करण्यात येणार आहे. “शासन आपल्या दारी” या उपक्रमातून शासनाच्या योजना सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्यात आल्या आहेत,असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, आतापर्यंत २ कोटी ८ लाख लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे. प्रशासन याच्यासाठी दिवसरात्र काम करीत आहे, एकही लाभार्थी योजनेपासून वंचित राहायला नको, यासाठी सर्वजण काम करीत आहेत. स्वच्छता मोहिमेमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री सहायता निधी मधून गरजू रुग्णांना आतापर्यंत २.५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

यावेळी उद्योग मंत्री श्री.सामंत म्हणाले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी हा आजचा दिवस ऐतिहासिक दिवस आहे. गेले १६ महिने हा महाराष्ट्र परकीय गुंतवणूकीमध्ये एक नंबर ला आहे. हे सर्व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे शक्य झाल आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मागणी करण्याअगोदरच त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या पाहिजेत. ठाण्यात पार्किंगची व्यवस्था व्हावी व ट्रॅफिक पासून मुक्ती मिळावी, यासाठी औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी-४२ येथे बहुस्तरीय वाहनतळ व्हावे, हा मुख्यमंत्री महोदयांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. यासाठी ३४ कोटी रुपये खर्च करुन हे बहुस्तरीय वाहनतळ पूर्ण करण्यात आले आहे.

यावेळी मंत्री श्री.सामंत यांच्या हस्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना ३५० टॅब देण्यात येणार आहे. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात काही पाल्यांना टॅबचे वाटप करण्यात आले. यापुढे दरवर्षी ८ ते १० मधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना टॅब वाटपाचे धोरण जाहीर करण्यात आले.औद्योगिक विकास महामंडळातील ४५० अधिकारी, कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. औद्योगिक विकास महामंडळातील अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजनेचा” (मेडीक्लेम पॉलिसी) सुरु करण्यात आली. या विम्याचे हप्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भरणार आहे.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.बिपिन शर्मा यांनी केले. यावेळी त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी-४२ येथे बहुस्तरीय वाहनतळा विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने व दिपप्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मानसी सोनटक्के यांनी केले. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, त्यांचे कुटुंब मोठया संख्येने उपस्थित होते.

# माजी पंतप्रधान नरसिंह राव, चौधरी चरणसिंह आणि शास्त्रज्ञ एमएस स्वामीनाथन यांना भारतरत्न



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने माजी पंतप्रधान नरसिंह राव, चौधरी चरण सिंह आणि शास्त्रज्ञ एमएस स्वामीनाथन यांना मरणोत्तर सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' देण्याची घोषणा केली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकापाठोपाठ तीन ट्विटमध्ये नरसिंह राव, चौधरी चरण सिंह आणि शास्त्रज्ञ एमएस स्वामीनाथन यांच्या योगदानाबाबत सांगत त्यांना पुरस्कार जाहीर केला.

माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांना भारतरत्न जाहीर करताना नरेंद्र मोदी म्हणाले की, "देशाचे माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांना भारतरत्न देऊन सन्मानित करता आले, हे आमच्या सरकारचे भाग्य आहे. हा सन्मान त्यांनी देशासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाला समर्पित आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतकऱ्यांचे हित आणि हक्कासाठी समर्पित केले. त्यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, देशाचे गृहमंत्री म्हणून राष्ट्र उभारणीला गती दिली. त्यांचे आमच्या शेतकरी बंधू- भगिनींप्रती असलेले समर्पण आणि आणीबाणीच्या काळात लोकशाहीप्रती असलेली त्यांची बांधिलकी संपूर्ण देशाला प्रेरणादायी आहे."

"माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांना भारतरत्नने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती देताना आनंद होत आहे. एक प्रतिष्ठित विद्वान आणि राजकारणी म्हणून नरसिंह राव यांनी देशाची मोठ्या प्रमाणावर सेवा केली. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि अनेक वर्षे संसद आणि विधानसभा सदस्य असताना त्यांनी केलेल्या कामामुळे ते आजही स्मरणात आहेत. भारताला आर्थिकदृष्ट्या प्रगत बनवण्यात आणि देशाच्या समृद्धी आणि विकासाचा भक्कम पाया रचण्यात त्यांचे दूरदर्शी नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले. नरसिंह राव हे देशाचे पंतप्रधान असताना भारताला जागतिक बाजारपेठेत मोठे यश मिळाले. त्यांच्या कार्यकाळात देशातील आर्थिक विकासाचे नवीन पर्व सुरू झाले. भारताच्या परराष्ट्र धोरण, भाषा आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाव्यतिरिक्त, त्यांना एक नेता म्हणून त्यांना ओळखले जाते.नरसिंह राव यांनी महत्त्वपूर्ण बदलांद्वारे भारताचे नेतृत्व केले", असेही नरेंद्र मोदी म्हणाले.

सुमारे ६८ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या सर्वोच्च सन्मानाने आतापर्यंत ५३ जणांना सन्मानित करण्यात आले आहे. स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राज गोपालाचारी, शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकटरामन आणि सर्वपल्ली राधाकृष्णन यांना १९५४ मध्ये पहिल्यांदा सन्मानित करण्यात आले होते. मोदी सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात आतापर्यंत १० जणांना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.

## राज्यसभेसाठी भाजपकडून महाराष्ट्रातील आठ जणांची नावं निश्चित



**नवी दिल्ली :** कार्यकाळ संपणाऱ्या तीन खासदारांपैकी भाजपकडून केवळ नारायण राणे यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता आहे. तीन जागांसाठी भाजपने आठ नावांची निश्चिती केली आहे.

राज्यसभेची निवडणूक जाहीर झाली असून देशभरातील रिक्त झालेल्या ५६ जागांसाठी येत्या २७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. या ५६ जागांपैकी ६ जागा महाराष्ट्रातील आहेत. त्यातील तीन जागा या भाजप खासदारांच्या असून त्यासाठी भाजपने महाराष्ट्रातून आठ जणांची नावं निश्चित केल्याचं सांगितलं जात आहे.

राज्यसभेच्या १५ राज्यातील ५६ जागा रिक्त होत आहेत. त्यात महाराष्ट्रातील ६ खासदारांचा कार्यकाळ संपत आहे. २७ फेब्रुवारीला राज्यसभा निवडणूकीसाठी मतदान होईल आणि त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसचा एक, राष्ट्रवादीचा एक आणि भाजपचे तीन आणि ठाकरे गटाचे एक अशा सहा खासदारांचा कार्यकाळ संपणार आहे.

भाजपचे विद्यमान खासदार नारायण राणे, प्रकाश जावडेकर, व्ही व्ही मुरलीधरन हे तीन खासदार निवृत्त होणार आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे अनिल देसाई, काँग्रेसचे खासदार कुमार केतकर आणि राष्ट्रवादीच्या खासदार वंदना चव्हाण यांचा समावेश आहे.

कार्यकाळ संपणाऱ्या तीन खासदारांपैकी भाजपकडून केवळ नारायण राणे यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता आहे. तीन जागांसाठी भाजपने आठ नावांची निश्चिती केली आहे. या आठ नावांमध्ये विनोद तावडे, विजया रहाटकर, अमरिश पटेल, माधव भंडारी, चित्रा वाघ, हर्षवर्धन पाटील, संजय उपाध्याय आणि नारायण राणे यांचा समावेश आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने १५ राज्यांच्या ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार, ८ फेब्रुवारी रोजी अधिसूचना जाहीर होणार आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येईल. १६ फेब्रुवारीला उमेदवारांच्या अर्जांची छाननी प्रक्रिया होईल. तसंच, २० फेब्रुवारीपर्यंत उमेदवार आपला अर्ज मागे घेऊ शकतील. तर, २७ फेब्रुवारीला सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडेल. तर, २७ तारखेलाच मतमोजणी होईल.

## लोकसभेला राज्यात आघाडी युतीवर भारी



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत देशाचा कल काय असेल, याबाबत इंडिया टुडे आणि सी व्होटरने केलेल्या सर्व्हेमध्ये महाराष्ट्रात काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची महाविकास आघाडी भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीवर भारी पडेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. देशात मात्र भाजपप्रणीत एनडीएच बाजी मारेल, असा या सर्व्हेचा अंदाज आहे.

लोकसभेच्या दृष्टीने महाराष्ट्र हे उत्तर प्रदेशनंतर मोठे आणि महत्त्वाचे राज्य आहे. त्यामुळे सत्तेची समीकरणे जुळवताना महाराष्ट्रात सर्वाधिक जागा मिळवण्याचे सर्वच पक्षांचे लक्ष्य असते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४८ पैकी ४१ जागा भाजप युतीने जिंकल्या होत्या. ज्यात भाजपला २२, तर शिवसेनेला १९ जागा मिळाल्या होत्या. तेव्हा शिवसेनेत फूट पडली नव्हती. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र निवडणूक लढवूनही राष्ट्रवादीला ४, तर काँग्रेसला १ जागा मिळाली होती, तर एमआयएमला एका जागेवर विजय मिळवता आला होता.

मात्र, गेल्या काही वर्षांत राज्याच्या राजकारणात झालेल्या चिखलामुळे सध्याचे चित्र वेगळे असल्याचे इंडिया टुडे-सी व्होटरच्या सर्वेक्षणात म्हटले आहे. आज लोकसभेच्या निवडणुका झाल्यास राज्यात महाविकास आघाडी भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यावर भारी पडणार असल्याचे चित्र समोर आले आहे. राज्यात महाविकास आघाडीला ४८ पैकी २६ जागा मिळतील, ज्यात काँग्रेसला १२, शिवसेना उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांना १४ जागा मिळण्याची शक्यता आहे, तर भाजप आघाडीला २२ जागा मिळतील, असा अंदाज आहे. महायुतीला महाराष्ट्रात ४०.५ टक्के, तर महाविकास आघाडीला ४४.५ टक्के मते मिळतील, असा अंदाज आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी या सर्व्हेवर प्रतिक्रिया दिली आहे. महाविकास आघाडीला ४८ पैकी ३५ जागा मिळतील, असा दावा त्यांनी केला. आम्ही प्रकाश आंबेडकरांच्या सोबत निवडणूक लढवणार आहोत. आम्हाला ३० ते ३५ जागा मिळतील, असे राऊत म्हणाले.

## राम मंदिरात लवकरच नवे पुजारी



**अयोध्या :** राम मंदिरात दिवसें दिवस भाविकांची गर्दी वाढताना दिसत आहे. दररोज सुमारे दोन ते तीन लाख भाविक रामदर्शन घेत असल्याचे सांगितले जात आहे. देणगीतही प्रचंड वाढ झाली आहे. कोट्यवधी रुपये रामचरणी अर्पण केले जात आहेत. राम मंदिरातील भाविकांची वाढती संख्या पाहता ट्रस्ट पुन्हा एकदा पुजाऱ्यांची भरती करण्याचा विचार करत असल्याचे सांगितले जात आहे. यासाठी ट्रस्ट विविध टप्प्यांवर चाचपणी करून पात्र पुजाऱ्यांची निवड करेल देशभरातून भाविक राम मंदिरात पोहोचत असून रामलल्लाचे दर्शन घेत आहेत. राम मंदिरात सेवेत गुंतलेले लोक रात्रंदिवस रामलल्लासोबत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचीही काळजी घेत आहेत. रामलल्लाची पूजा मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांच्या देखरेखीखाली होत आहे. राम मंदिरासाठी नव्याने नियुक्त झालेल्या पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कामही सुरू आहे. मंदिराच्या पुजाऱ्यांच्या ड्रेस कोडमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. राम मंदिरातील पुजाऱ्यांसाठी भगव्या रंगाचा कुर्ता आणि धोतर असा ड्रेसकोड आहे. नव्याने बांधलेल्या राम मंदिरातील पुजाऱ्यांसाठी नवा ड्रेसकोड लागू केला जाऊ शकतो, असे सांगितले जात आहे. पुरोहितांसाठी तयार करण्यात येत असलेल्या ड्रेसकोडमध्ये उत्तर आणि दक्षिण भारतातील मंदिरांच्या परंपरांचा समन्वय दिसून येईल.

## दि.१७ आणि १८ फेब्रुवारी रोजी ठाणे येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन



**नवी मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता आयुक्तालय यांच्यावतीने दि.१७ आणि १८ फेब्रुवारी,२०२४ रोजी ठाणे येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी रायगड डॉ.योगेश म्हसे, कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त श्री.दि.दे.पवार तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ठाणे येथे होणाऱ्या महारोजगार मेळाव्यासाठी मोठया प्रमाणात रोजगारांची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उद्योजक संस्था, संघटना, औद्योगिक कंपन्या, रोजगार देणाऱ्या संस्था, यांच्याशी समन्वय साधून मोठया प्रमाणावर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्योजक नोंदणी आणि रिक्त पदे अधिसूचित करणे यासोबतच विविध उद्योजक संघटनांना यामध्ये सामावून घेतले जाणार आहे. मेळाव्यात येणाऱ्या संस्था आणि बेरोजगार तरुणांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप आणि अन्य व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. महारोजगार मेळाव्याच्या पूर्व व नंतरच्या प्रसिध्दीसाठी विशेष नियोजन केले जात आहे.

## शेतकऱ्यांना पोलिसांनी नोएडा येथे रोखले

**नवी दिल्ली :** पायाभूत सुविधांसह अन्य कामासाठी घेतलेल्या भूखंडाच्या वाढीव नुकसानभरपाईसाठी शेतकरी संघटना डिसेंबर २०२३ पासून आंदोलन करत आहेत. शेतकरी संघटनांनी नोएडा व ग्रेटर नोएडा विकास प्राधिकरणाकडून भूखंड व वाढीव नुकसानभरपाईची मागणी केली. मात्र, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांनी दिल्लीकडे वाटचाल सुरू केली. संसदेला घेराव घालून मागण्या मांडण्याचा निर्णय जाहीर केला. शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे उत्तर प्रदेश-दिल्ली महामार्गावर चक्काजाम झाला. या आंदोलनामुळे नोएडा एक्स्प्रेस-वे बंद केला आहे.

नोएडा, ग्रेटर नोएडा प्राधिकरण, एनटीपीसी व अंसल बिल्डरच्या विरोधात नोएडा येथील शेतकरी ६० दिवसांपासून आंदोलन करत आहेत. त्यांना तीन शेतकरी संघटनांनी पाठिंबा दिला.

शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी राज्य सरकार व स्थानिक प्रशासनावर दबाव बनवण्यासाठी ७ फेब्रुवारीला शेतकरी महापंचायत बनवली होती. ८ फेब्रुवारीला संसदेपर्यंत मार्च काढण्याची घोषणा केली. आंदोलक शेतकऱ्यांना ठिकठिकाणी पोलीस रोखत आहेत. पोलीस व शेतकऱ्यांमध्ये झटापट उडत आहे. ट्रॅक्टर ट्रॉली व चालत दिल्लीकडे निघालेल्या शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने १४४ कलम लागू केले.

## कंपन्यांनी नियमांचे गांभीर्याने पालन करणे अपेक्षित

### पेटीएमचे नाव न घेता आरबीआयचा सल्ला




**मुंबई :** पेटीएम पेमेंट्स बँक वर देशातील बँकिंग रेग्युलेटर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ३१ जानेवारी २०२४ रोजी बंदी घातली होती. गुरुवारी रिझर्व्ह बँकेने पतधोरण जाहीर करताना आरबीआय गव्हर्नर शक्तीकांत दास म्हणाले की, नियमनच्या कक्षेत येणाऱ्या कंपन्यांनी नियमांचे गांभीर्य आणि प्रक्रियांचे पालन करणे अपेक्षित आहे. त्यांनी ग्राहकांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. त्यावेळी त्यांनी पेटीएमचे नाव घेतले नाही. त्यांचा सल्ला केवळ पेटीएमच्या संदर्भातच नव्हे तर इतर फिनटेक कंपन्यांच्या संदर्भातही होता.

आरबीआय गव्हर्नर म्हणाले, पेटीएमला सुधारण्यासाठी पुरेसा वेळ दिला होता. मात्र वारंवार नियम न पाळल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. पेटीएमचे नाव न घेता ते म्हणाले की, जर सर्व नियमांचे पालन केले गेले असेल तर केंद्रीय बँक नियंत्रित कंपनीवर कारवाई का करेल? पेटीएम पेमेंट्स बँकेची वैयक्तिक बाब आहे. या प्रकरणात पेमेंट सिस्टमबद्दल काळजी करण्याची गरज नाही. आरबीआय नेहमी नियमन कक्षेत येणाऱ्या कंपन्या योग्य पावले उचलतील याची खात्री करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

## रिअल इस्टेटमधील गुंतवणूक वाढेल: डोमनिक रोमेल

### स्थिर रेपो दरांमुळे घर खरेदीदार आणि विकासकांसाठी कर्जावरील स्थिर व्याजदर मिळतील



**मुंबई :** रेपो दर ६.५ टयांवर स्थिर ठेवल्याबद्दल आम्ही आरबीआयचे आभार मानतो. संतुलित अंतरिम अर्थसंकल्पानंतरची ही चांगली वाटचाल आहे. रेपो दर अपरिवर्तित ठेवण्याच्या निर्णयाने उद्योग आणि बाजाराच्या भावनांचा विचार केला आहे. हे सातत्य रिअल इस्टेट क्षेत्रातील आत्मविश्वास वाढवते, गुंतवणूक आणि वाढीला चालना देते. स्थिर रेपो दरांमुळे घर खरेदीदार आणि विकासकांसाठी कर्जावरील स्थिर व्याजदर मिळतील, ज्यामुळे हप्ता अधिक वाजवी राहील. याचा नक्कीच परवडणाऱ्या घरांवर सकारात्मक परिणाम होतो आणि बाजाराला लवचिक आणि भरभराट ठेवत रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये आणखी गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन मिळेल. आम्हाला आशा आहे की यामुळे एमएमआरमधील मालमत्तेची मागणी वाढेल, अशी प्रतिक्रिया एमएमआरच्या रिअल इस्टेट उद्योगाची सर्वोच्च संस्थेवर क्रेडाई-एमसीएचआईचे अध्यक्ष डोमनिक रोमेल यांनी आरबीआयच्या पतधोरणावर दिली.

# शासन समाजातील प्रत्येक गरजू वंचिताच्या कल्याणासाठी प्रयत्नशील - अशोक शिनगारे




**ठाणे :** समाजातील अज्ञानरुपी अंधार नाहीसा करुन तळागाळातील प्रत्येक गरजू वंचिताचे कल्याण व्हावे, त्या कुटुंबाचा सर्वांगिण विकास व्हावा, यासाठी शासन सर्व प्रकारे प्रयत्नशील आहे. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे केले.

"लिडकॉम आपल्या दारी" या उपक्रमांतर्गत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय, ठाणे यांच्या वतीने टाऊन हॉल, कोर्ट नाका येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेचे उदघाटन जिल्हाधिकारी श्री.अशोक शिनगारे यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालयाच्या जिल्हा व्यवस्थापक आरती पुराणिक, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक श्री.नागेंद्र मंचाल, MCED चे श्री. कांदळगावकर, श्री.सुबोध बायस, लिडकॉमचे पालघर व्यवस्थापक श्री.दगडखैर हे मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.शिनगारे पुढे म्हणाले की, शासनाचे विविध विभाग, महामंडळे, बँका गरजू लाभार्थ्यांना यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून मदत करण्यासाठी सक्रिय आहेत. बँकांनी सहकार्याची भूमिका घेऊन जास्तीत जास्त गरजू व्यक्तींना कर्ज मंजूरी द्यावी. महामंडळांनी शिबिरे/मेळाव्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजूंना लाभ द्यावा. स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समाजातील शेवटच्या गरजू व्यक्तीच्या विकासासाठी अतिशय सकारात्मक आणि संवेदनशील आहेत. त्यांचे आपण सर्वांनी अनुकरण करायला हवे. सकारात्मकतेने सर्वांनी गरजू व्यक्तींना मदत करून त्यांचा विकास साधायला हवा. गरजू लाभार्थ्यांनी प्रस्ताव दाखल करून शक्य त्या सर्व योजनांचा लाभ घ्यावा, मात्र त्याचबरोबर आपल्या कामाचा दर्जा, उत्पादनाचा दर्जा उच्च प्रतीचा असेल, यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. उत्पादन आणि त्याची विक्री व्यवस्था उभी राहायला हवी.

शेवटी सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्री.सुमंत भांगे तसेच लिडकॉमचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांचे सकारात्मक काम सर्वांना ऊर्जा देणारे मार्गदर्शक व प्रेरक आहे, असे सांगून जिल्हाधिकाऱ्यांनी आपण सर्वांनी देखील याच सकारात्मकतेने कार्यरत असायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आपल्या प्रस्तावनेत जिल्हा व्यवस्थापक श्रीमती पुराणिक यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालयामार्फत चर्मकार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. चर्मकार समाजाच्या (चांभार, मोची, ढोर व होलार) इ. व्यक्तींचे जीवनमान उंचाविणे, समाज प्रवाहात मानाचे स्थान मिळविण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी योजनेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी हे महामंडळ काम करते.

यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक श्री.नागेंद्र मंचाल, MCED चे श्री. कांदळगावकर, श्री.सुबोध बायस, लिडकॉमचे पालघर व्यवस्थापक श्री.दगडखैर या मान्यवरांनी चर्मकार समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती तसेच एम.सी.ई.डी मार्फत देण्यात येणाऱ्या उद्योजकता प्रशिक्षणाची तसेच बँकाची भूमिका या विषयांची माहिती दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने कर्ज मंजूरी झालेल्या काही लाभार्थ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात धनादेश वितरण करण्यात आले, तसेच महामंडळाच्या योजनांचा लाभ घेवून यशस्वी वाटचाल करणाऱ्या लाभार्थ्यांना गौरविण्यातही आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवृत्त मुख्याध्यापक श्री.अमर पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रीती सूर्यवंशी यांनी केले.

## पालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रातील सहाय्यक आयुक्त प्रीती गाडे यांची तडका फडकी बदली

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रातील सहाय्यक आयुक्त प्रीती गाडे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी अ प्रभाग क्षेत्राचा अनुभव असलेले किशोर खुताडे यांची वर्णी लागली आहे. प्रशासकीय पदावर असलेल्या प्रीती गाडे यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रात सहाय्यक आयुक्त म्हणून चार महिन्यापूर्वीच नियुक्ती झाली होती. परंतु पालिकेच्या आयुक्त इंदुराणी जाखड यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पालिकेतील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदली करण्याचा निर्णय घेतला आणि सहा अधिकाऱ्यांच्या तातडीने बदली आदेश दिले.

या सहा अधिकाऱ्यांमध्ये अ प्रभाग क्षेत्राच्या सहाय्यक आयुक्त प्रीती गाडे यांची मुख्यालयात घनकचरा व्यवस्थापन या विभागात बदली कारण्यात आली असून त्यांच्या जागी अ प्रभाग क्षेत्राचा अनुभव असलेले किशोर खुताडे यांची नियुक्ती झाली आहे. प्रशासकीय अधिकारी प्रीती गाडी यांनी भिवंडी महानगरपालिकेत अनधिकृत बांधकाम विभागात यशस्वीपणे सांभाळल्यानंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रात सहाय्यक आयुक्तपदी त्यांना प्रशासकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आले होते. परंतू केवळ पाच महिन्याच्या कालावधीत प्रीती गाडे यांची बदली झाली. सहाय्यक आयुक्त प्रीती गाडे यांनी अ प्रभाग क्षेत्राचा सहाय्यक आयुक्त म्हणून पद भार स्वीकारल्यानंतर सतत निवडणुकीच्या मीटिंग करिता कधी हेड ऑफिस तर कधी निवडणूक कार्यालयात जावे लागत असल्याने कार्यालयात अतिशय कमी वेळ उपलब्ध असतात त्यामुळे तक्रार करण्यासाठी आलेल्या नागरिकांना प्रीती मॅडम उपलब्ध होत नसत. अ प्रभाग क्षेत्रात पदभार स्वीकारल्यानंतर शहाड मोहना आंबिवली अटाळी वडवली बल्यानी मांडा टिटवाळा या प्रत्येक प्रभागात फिरून अनधिकृत बांधकामाची पाहणी केली नाही.

कोणत्या प्रभागात किती अनाधिकृत इमारती तयार होत आहेत कोणत्या प्रभागात किती अनधिकृत चाळी तयार होत आहेत याची कधीही प्रत्यक्ष फिरून पाहणी केली नाही कधी हेड ऑफिस तर कधी निवडणुकीच्या कामाकरिता बाहेर जावे लागत असल्याने प्रभागातील अनधिकृत बांधकामांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती.

# ‘शिवरायांचा छावा’मध्ये राहुल देव साकारणार काकर खान



**मुंबई :** अनेक हिंदी चित्रपट व मालिकांमध्ये खलनायक म्हणून झळकलेले अभिनेते राहुल देव आता आगामी ‘शिवरायांचा छावा’ या चित्रपटात ‘काकर खान’ ही खलनायकी व्यतिरेखा साकारणार आहे. ‘शिवरायांचा छावा’ हा भव्य ऐतिहासिक पट रुपेरी पडद्यावर उलगडणारा ए.ए. फिल्म्स आणि एव्हरेस्ट एंटरटेंमेंट प्रस्तुत आणि दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित ‘शिवरायांचा छावा’ १६ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. औरंगजेबाने बुऱ्हाणपूरची पूर्ण जबाबदारी काकर खान या अनुभवी सरदारावर सोपविली होती. लोकांवर जिझिया कर लावत काकर खानने जनतेस वेठीस धरले होते. काकरखानच्या अन्यायी राजवटीपासून छत्रपती संभाजी महाराजांनी रयतेची सुटका केली होती.

आपल्या या भूमिकेविषयी बोलताना राहुल देव सांगतात की, ‘आजवरच्या अभिनय कारकिर्दीत अनेक खलनायकी भूमिका साकारल्या असल्या तरी क्रूरकर्मा ‘काकर खान’ ही ऐतिहासिक भूमिका करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. एखादी विशेष भूमिका वठवताना अगदी भाषेपासून चालण्या बोलण्याच्या सवयी पर्यंतचे बदल करावे लागतात. काकरखान खानची भूमिका असल्याने उर्दू भाषा आत्मसात करणं मला गरजेचं होत. प्रत्येक भाषेचा स्वत:चा असा लहेजा असतो, तो लहेजा लक्षात घेत ही भाषा मी शिकून घेतली. भाषेनंतर प्रश्न होता तो लुक्सचा. त्यामुळे देहबोलीही तितकीच बोलकी असण्याची महत्त्वाची जबाबदारी माझ्यावर होती. ती मी माझ्या अभिनयातून केली असल्याचे राहुल सांगतात. मल्हार पिक्चर्स कं.चे वैभव भोर, किशोर पाटकर, मधू यांनी या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर सह-निर्मिती भावेश रजनीकांत पंचमतीया यांनी केली आहे. कार्यकारी निर्माता प्रखर मोदी आहेत. कथा दिग्पाल लांजेकरांनी लिहिली असून पटकथा-संवाद आणि गाणी देखील त्यांचीच आहेत. गाण्यांना साजेसं संगीत युवा संगीतकार देवदत्त मनीषा बाजी यांनी दिलं आहे. पार्श्वसंगीत अमर मोहिले यांचे आहे. चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी ए. ए.फिल्म्स सांभाळत आहे.

# ऑस्ट्रेलियनच पुन्हा जगज्जेते




**नवी दिल्ली :** वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३ फायनल आणि एकदिवसीय वर्ल्ड कप २०२३ च्या फायनलमध्ये वरिष्ठ स्तरावर भारताचा पराभव केल्यानंतर, ऑस्ट्रेलियाने आता कनिष्ठ स्तरावर देखील भारतीयांच्या स्वप्नांचा चुराडा केला. दक्षिण आफ्रिकेतील बेनोनी येथे खेळल्या गेलेल्या अंडर-१९ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात त्यांनी टीम इंडियाचा ७९ धावांनी पराभव केला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत सात गडी गमावून २५३ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ ४३.५ षटकांत १७४ धावांवर गारद झाला.

कांगारूंनी वर्षभरात तिसऱ्यांदा भारतीय संघाचे स्वप्न भंग केले आहे. अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेतील ऑस्ट्रेलियाचे हे चौथे विजेतेपद आहे. याआधी त्याने १९८८, २००२ आणि २०१० मध्येही विजेतेपद पटकावले होते. ऑस्ट्रेलियाने १४ वर्षांनंतर अंडर-१९ विश्वचषक जिंकला आहे. भारत पाच वेळा चॅम्पियन आहे. त्याने २०००, २००८, २०१२, २०१८ आणि २०२२ मध्ये विजेतेपदावर कब्जा केला होता. यासह ऑस्ट्रेलियाने सलग दुसरा अंडर-१९ विश्वचषक जिंकण्याचा भारताचा इरादाही उधळला. आतापर्यंत केवळ पाकिस्तानलाच सलग दोनदा अंडर-१९ विश्वचषक जिंकता आला आहे. २००४ आणि २००६ मध्ये त्याने हे केले होते. पाकिस्तानने १९ वर्षांखालील विश्वचषक देखील दोनदा जिंकला आहे तर इंग्लंड, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेशने प्रत्येकी एकदा विजेतेपद पटकावले आहे.

ऑस्ट्रेलियाने दिलं होतं २५४ धावांचं लक्ष

अंडर-१९ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारत विरुद्ध ५० षटकात २५३ धावा केल्या. भारताला विजेतेपदासाठी २५४ धावा कराव्या लागत होत्या. ऑस्ट्रेलियाकडून हरजस सिंगने सर्वाधिक ५५ धावांची खेळी खेळली. तर कर्णधार वेबगेनने ४८ धावा केल्या. मात्र, त्याचे अर्धशतक पूर्ण करता आले नाही. सलामीला आलेला हॅरी डिक्सनही ४२ धावा करून बाद झाला. याशिवाय ऑलिव्हर पीक ४६ धावांवर नाबाद राहिला आणि टॉम स्ट्रेकर ८ धावांवर नाबाद राहिला. भारताकडून राज लिंबानीने सर्वाधिक विकेट घेतल्या. त्याने तीन फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले तर नमन तिवारीने २ बळी घेतले. याशिवाय सौम्या पांडे आणि मुशीर खान यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

# रोहित आणि हार्दिकमधील लढाई चव्हाट्यावर

**मुंबई :** रोहित शर्मा. टीम इंडियाचा सध्याचा कर्णधार आणि मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार. माजी कारण मुंबईने अलीकडेच हार्दिक पांड्याला आपला नवा कर्णधार म्हणून निवडले आहे. या निर्णयावर यापूर्वीही मोठा गदारोळ झाला होता आणि हे आता थांबणार नाही असे दिसते. आता या दोन्ही खेळाडूंनी एकमेकांना ट्विटरवर अनफॉलो केलं आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्समधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचं दिसतंय. खरं तर, मुंबईचे प्रशिक्षक मार्क बाउचर यांनी अलीकडेच रोहितऐवजी पांड्याकडे कर्णधारपद का दिले हे सांगितले होते आणि रोहितची पत्नी रितिका हिने या व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली आहे.

आयपीएल २०२४ सुरू होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने रोहित शर्माला हटवून हार्दिक पांड्याला संघाच्या कर्णधारपदी नियुक्त केल्याची चर्चा बऱ्याच दिवसांपासून चर्चेत होती. IPL २०२४ साठी खेळाडूंच्या लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याला गुजरात टायटन्समध्ये खरेदी करून सर्वांना आश्चर्यचकित केले. यानंतर काही दिवसांनी मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याला संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. हार्दिक पांड्या कर्णधार बनल्याने गेल्या १० हंगामात संघाचे नेतृत्व करणाऱ्या रोहित शर्माला कर्णधारपदावरून पायउतार व्हावे लागले. याबाबत अनेक दिवस चर्चा सुरू होती. अलीकडेच हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला, जेव्हा मुंबई इंडियन्सच्या प्रशिक्षकाने फ्रेंचायझीच्या या निर्णयाबाबत स्पष्टीकरण दिले, पण यानंतर फ्रँचायझीच्या या निर्णयावर बरीच टीका झाली आणि रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेह हिने या मुद्द्यावर नकारात्मक प्रतिक्रिया दिली. या घटनेनंतर सोशल मीडियावर पुन्हा एकदा दोन्ही क्रिकेटपटूंनी एकमेकांना




अनफॉलो केल्याचा दावा केला होता.

तथापि, या अफवांच्या सत्यतेची पुष्टी झालेली नाही आणि सोशल मीडिया वापरकर्त्यांनी या विषयावर त्यांचे स्वतःचे दावे सादर केले आहेत. काही वापरकर्त्यांनी लिहिले की या दोन खेळाडूंनी कधीही इन्स्टाग्रामवर एकमेकांना फॉलो केले नाही, तर काहींनी लिहिले की, हार्दिक पांड्याने रोहित शर्माला अनफॉलो केले, रोहित शर्माने केलेले नाही.

पाच वेळा आयपीएल चॅम्पियन मुंबई इंडियन्सने डिसेंबरमध्ये घोषित केले होते की अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या लीगच्या २०२४ आवृत्तीत संघाचे नेतृत्व करेल. हार्दिक पंड्याने IPL २०२२ आणि IPL २०२३ मध्ये गुजरात टायटन्सचे नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने लीगच्या पहिल्या आवृत्तीत विजेतेपद पटकावले. याशिवाय दुसऱ्या सत्रात अंतिम फेरी गाठण्यात संघाला यश आले.

# सध्याचं राजकारण त्रासदायक - मोहन आगाशे

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात सुरु असलेल्या राजकारणातील अनपेक्षित घडामोडी, पक्ष फोडाफोडी हे पाहून ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी नुकताच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये ‘सध्याचे राजकारण मला खूप त्रास देतय, पुढील पिढीची काळजी वाटत’ असे म्हटले आहे. त्यांच्या या विधानाने सर्वांचे लक्ष वेधले आहे.




डॉ. मोहन आगाशे यांनी ‘तारांगण’ या युट्युब चॅनलला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये त्यांनी सध्याच्या राजकारणावर भाष्य केले आहे. ‘सध्याच्या राजकारणामुळे अस्वस्थ वाटत आहे. पुढील पिढीसाठी आपण काय सोडून जात आहोत, याकडे कोणी लक्षात देत नाही. कदाचित या वाईटातून चांगलेही घडू शकते. जी अस्वस्थता मी अनुभवत आहे, तशी इतरही अनुभवत असतील. त्यामुळे पुढील पिढी यातून आणखी काही चांगले करेल असा आशेचा किरण आहे’ असे मतही डॉ. आगाशे यांनी व्यक्त केले.

पुढे मोहन आगाशे यांनी राजकारणावर परखड मत व्यक्त करत म्हटले की, ‘राजकारणाचा आता धंदा झाला आहेसगळ्याच नेत्यांकडून साफ निराशा झाली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. राजकारण हा धंदा झाला आहे. त्यामुळे प्रामाणिक राजकारणींना याचा त्रास होत आहे. एखाद्या व्यवसायात समाजभान विसरलेले धंदेवाईक लोक शिरली की त्या क्षेत्राचे नुकसान होते.’

डॉ. मोहन आगाशे यांच्या कामाविषयी बोलायचे झाले तर त्यांचा ‘लोकशाही’ हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात त्यांनी महत्त्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, अभिनेत्री तेजश्री प्रधान, अंकित मोहन, गिरीश ओक, समीर धर्माधिकारी, भार्गवी चिरमुले, अमित रियान, शंतनु मोघे, प्रसन्न केतकर, सुश्रुत मंकणी, अजिता कुलकर्णी, सोनल वाघमारे आदींच्या भूमिका आहेत. घराणेशाहीत जगणाऱ्या प्रस्थापितांचा कोणत्याही थराला जाऊन सत्ता मिळवण्याचा हव्यास आणि या सत्तासंघर्षात कोणाचातरी जीव जाणार आहे, पण कोणाचा जीव कोण घेणार या रहस्याचं कोडं चित्रपटात उलगडण्यात आले आहे.

# निधनाच्या स्टंटमुळे पूनम पांडेला मोठा झटका



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्री पूनम पांडे ही चर्चेत आहे. तिने केलेल्या स्टंटने सर्वांचे लक्ष वेधले. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाने पूनमचे निधन झाल्याची माहिती तिच्या सोशल मीडिया अकाऊंटद्वारे देण्यात आली होती. त्यानंतर पूनमने एक व्हिडीओ शेअर करत जीवंत असल्याची माहिती दिली. या सर्व प्रकरणानंतर पूनमचे काहींनी कौतुक केले तर काहींनी तिला ट्रोल केले. आता या सगळ्याचा पूनमला मोठा फटका बसला आहे. पूनम पांडेचे अनेक ब्रॉंडसोबत करार आहेत. पण पूनमने केलेल्या निधनाच्या स्टंटने मोठा फटका बसला आहे. अमेरिकेतील फार्मास्यूटिकल कंपनी मर्कने भारतीय उपकंपनी असलेल्या एमएसडीने पूनम पांडेला मोठा झटका दिलाय. हा निधनाचा स्टंट करणे पूनम पांडेला महागात पडले. आता हा मोठा करार रद्द करण्यात आला आहे. क्रिएटिव्ह मार्केटिंग सोल्युशन्स एजन्सीसोबतचा तिचा करार संपवला आहे. विशेष म्हणजे ही तीच एजन्सी आहे जी मॉडेल आणि अभिनेत्री पूनम पांडेच्या या वादग्रस्त पब्लिसिटी स्टंटमध्ये सामील होती. या कंपनीला देखील मोठा फटका बसल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे.

पूनम पांडेच्या या स्टंटमुळे तिला फटका तर बसला आहे त्यासोबतच त्याचे काही फायदे देखील झाले आहेत. पीटीआयने दिलेल्या रिपोर्टनुसार, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगामुळे निधन झाल्याची अफवा पसरवणारी पूनम पांडेची नियुक्ती सरकारच्या कर्करोगच्या मोहिमेची ब्रँड ॲम्बेसिडर होण्याची शक्यता आहे. पूनमची टीम आणि आरोग्य मंत्रालय यांच्यामध्ये याबाबत चर्चा सुरु आहे. आता तिला ही जबाबदारी मिळणार की नाही हे येत्या काळात समोर येणार आहे. काही दिवसांपूर्वी पूनमच्या टीमने गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाने पूनमचे निधन झाल्याचे सांगत खळबळ माजवली होती. त्यानंतर पूनमने जीवंत असल्याचे व्हिडीओ शेअर करत सांगितले. तिचा हा व्हिडीओ पाहून अनेकांनी तिला ट्रोल केले. कर्करोगाशी संबंधीत जागरुकता निर्माण करण्यासाठी हे मोठे पाऊल उचलले असे सांगत पूनमने काहींची मने जिंकली. पण काहींनी तिला चांगलेच सुनावले.

त्यानंतर पूनमने २०१३मध्ये ‘नशा’ या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पूनम ही विशेष करुन तिच्या न्यूड आणि बोल्ड फोटोंसाठी ओळखली जायची. तिने कंगना रणौतच्या ‘लॉकअप’ या रिॲलिटी शोमध्ये सहभाग घेतला होता. या शोमध्ये देखील वादग्रस्त विधान आणि अश्लील वागण्यामुळे ती चर्चेत होती.

# अभिनेता अर्शद वारसी पुन्हा लग्न करणार



**मुंबई :** अरशद वारसीने स्वत: याबाबत माहिती दिली आहे. तो रजिस्टर पद्धतीने लग्न करणार असल्याचे समोर आले आहे.

बॉलिवूडमधील कॉमेडी आणि गंभीर भूमिका करणारा अभिनेता म्हणून अरशद वारसी ओळखला जातो. तो सतत त्याच्या भूमिकांमधून प्रेक्षकांची मने जिंकताना दिसतो. सध्या अरशदच्या खासगी आयुष्याची चर्चा रंगली आहे. अरशद हा लवकरच पुन्हा लग्नबंधनात अडकणार आहे. आता अरशद कोणाशी लग्न करतोय? कधी करतोय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

अरशद वारसी हा पत्नी मारीया गोरेट्टीशी पुन्हा लग्न करणार आहे. १४ फेब्रुवारी १९९९ साली अरशदने मारीयाशी चर्चमध्ये जाऊन पारंपरिक पद्धतीने लग्न केले होते. त्यांच्या लग्नाला जवळपास २५ वर्षे पूर्ण होत आहे. पण त्यांनी अद्याप कायदेशीरपण विवाह केलेला नाही. त्यामुळे लग्नाच्या २५व्या वाढदिवशी अरशदने पुन्हा लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. तो कोर्टात रजिस्टर पद्धतीने लग्न करणार आहे.

अरशदने नुकताच ‘टाइम्स ऑफ इंडिया’ला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्याने इतक्या वर्षांनंतर रजिस्टर पद्धतीने लग्न करण्यामागचे कारण सांगितले आहे. ‘आमच्या डोक्यात बराच वेळा हा विचार आला होता पण आमच्यासाठी तो महत्त्वाचा नव्हता. पण जेव्हा संपत्तीशी संबंधीत आणि इतर काही गोष्टी करताना लागणाऱ्या कागद पत्रांच्या वेळी आमच्या ही गोष्ट लक्षात आली. आम्ही फक्त कायद्यासाठी हे करत आहोत. नाहीतर एक सोबती म्हणून जर तुम्ही एकमेकांना कमिटमेंट दिली असेल तर इतर गोष्टी महत्त्वाच्या ठरत नाहीत’ असे अरशद म्हणाला.

पुढे मुलाखतीमध्ये त्याने लग्नाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याचे सांगत म्हटले, ‘आमचे केवळ हॅप्पी मॅरिड लाइफ नसून यशस्वी मॅरिड लाइफ आहे. आमच्या आयुष्यातील ही २५ वर्षे अतिशय वेगळी होती. मारीया आणि मी अतिशय वेगळे आहोत. त्यामुळेच कदाचित आम्ही आज एकत्र आहोत. मारीया ही अतिशय तापट आहे आणि मी एकदम शांत. ती सुशिक्षित आहे आणि माझे फारसे शिक्षण झालेले नाही. तिच्या आयुष्यात फार मोजकी व्यक्ती आहेत आणि मी जिकडे जाईल तिकडचा होऊन जातो. या आणि इतर काही गोष्टींमुळेच कदाचित आम्ही आज एकत्र आहोत. तिचा वेडेपण आणि माझा शांत स्वभाव आम्हाला एकमेकांशी बांधून ठेवतो.’

# पानपसंद, मँगो मूड, कॉफी ब्रेक आता रिलायन्सच्या ताब्यात


**मुंबई :** आपल्या चवीने १९९० च्या दशकात लहान मुलांना वेड लावणाऱ्या ‘रावळगाव’ने आपला कँडी व्यवसाय रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडला विकला आहे. कंपनीने रावलगावचा ट्रेडमार्क्स, रेसिपीज व स्वामित्व हक्क ताब्यात घेतले आहेत; मात्र, प्रॉपर्टी, जमीन, प्लांट, बिल्डिंग, सामुग्री व मशिनरी रावळगावकडेच राहतील. हा व्यवहार २७ कोटी रुपयांना झाला.

रावळगाव कंपनीने सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून साखरेशी संबंधित कन्फेक्शनरी व्यवसाय चालवणे कठीण बनले होते. या क्षेत्रात संघटित व असंघटित क्षेत्रात स्पर्धा वाढू लागली. त्यामुळे आमचा बाजारातील हिस्सा कमी झाला. कच्चा माल, कामगारांवरील वाढता खर्च, विजेची वाढती बिले त्यामुळे नफा कमी झाला. कंपनीने देशात पहिल्यांदाच पानाचा स्वाद असलेली पानपसंद, मँगो मूड, कॉफी ब्रेक, टूटी-फ्रूटी, सुप्रीम टॉफी, कोको क्रीम आदी उत्पादने आणली.‘रावळगाव शुगर कंपनी’ची स्थापना उद्योजक वालचंद हिरानंद यांनी १९३३मध्ये नाशिक जिल्ह्यातील रावळगाव येथे केली होती. १९४२ मध्ये या कंपनीने रावळगाव नावाचे चॉकलेट बनवण्यास सुरुवात केली. अल्पावधीमध्ये हे चॉकलेट बच्चे कंपनीच्या पसंतीत उतरले. त्यानंतर पान पसंद या चॉकलेटनेही लहानांपासून थोरांना वेड लावले. आताही या कंपनीकडे मँगो मूड, कॉफी ब्रेक, टूटी फ्रुटी, पान पसंद, चोको क्रीम आणि सुप्रीम यासारखे हे ब्रँड आहेत.

# महाराष्ट्राची संस्कृती मराठी बाणाच्या माध्यमातून सातासमुद्रपार - उदय सामंत

**रत्नागिरी :** कोकणातील पारंपरिक जाखडी लोककला त्याचबरोबर १५० कलावंताचा गीत, संगीत, मराठी सण उत्सव परपंरांवर आधारित ‘मराठी बाणा’ कलाकृतीने आज रत्नागिरीकर मंत्रमुग्ध झाले. मराठी बाणा कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती सातासमुद्रापार नेण्याची किमया केली आहे, असे गौरवोद्गार पालकमंत्री उदय सामंत यांनी काढले.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व रत्नागिरी जिल्हा प्रशासनाच्यावतीने येथील प्रमोद महाजन क्रीडा संकुलात अशोक हांडे यांचे लेखन आणि संकल्पना



असणारा ‘मराठी बाणा’ हा ७० एमएम मराठी कार्यक्रम आज झाला. तत्पूर्वी कोकण नमन कला मंचचे अध्यक्ष पी टी कांबळे यांनी जाखडी पारंपरिक कलेच्या माध्यमातून नमन, स्तवन, गण, गवळण सादर केली. मराठी बाणाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने मराठी सण, उत्सव, परंपरा हे भूपाळी, शेतकरी गीत, वासुदेव, वारकऱ्यांची दिंडी, धनगरी नृत्य, ठाकर नृत्य, कोळी नृत्य, आगरी नृत्य, भजन, गवळण, भारुड, दहिहंडी, गणेश उत्सव, लेझीमच्या माध्यमातून गीत, संगीत आणि नृत्याविष्कारातून सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

पालकमंत्री श्री. सामंत यावेळी शुभेच्छा देताना म्हणाले, महाराष्ट्राची संस्कृती सातासमुद्रापार नेण्याची किमया महाराष्ट्राच्या विशेषत: कोकणच्या सुपुत्राने अशोक हांडेनी केली आहे. जागतिक पातळीवरही त्यांचे नाव घेतले जाते. आपली मराठी आणि मराठीची संस्कृती ही कोकणात न राहता ती जगभरात गेली आहे. १५ तारखेपर्यंत चालणाऱ्या महासंस्कृती महोत्सवाचा रत्नागिरीकरांनी आस्वाद घेवून, अशीच भरभरुन दाद द्यावी.

सुरुवातीला श्री. हांडे यांनी श्री नटराजाच्या मूर्तीला तसेच जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड, बीपीन बंदरकर, पत्रकार हेमंत वणजू आदी रंगमंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाला रत्नागिरीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून भरभरुन दाद दिली.

Owner Mr. Sachin Thik, Printer & Publisher Mr. Ganesh Pawar the newspaper Weekly is printed at Raj Printers 119/9, Nirmal Anand Nagar, SaiNath Chawl, Dhokli, Thane, Maharashtra and is Published at At, Po. Isavali Patharwadi, Tel. Lanja, Dist. Ratnagiri, Maharashtra. Mobile No- +91- 9860626595/7400104268 Email Id : dabavlive@gmail.com NI No MAHMAR 2014 / 59698

हे साप्ताहिक मालक, श्री. सचिन विजय ठिक, मुद्रक व प्रकाशक आणि मुख्यसंपादक श्री. गणेश पवार यांनी राज प्रिंटर्स ११९/९, निर्मल आनंद नगर, साईनाथ चाळ, ढोकाळी, ठाणे, महाराष्ट्र येथे छापून मु. पो. इसवली पाथरवाडी, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथे प्रकाशित केले.
**ठाणे कार्यालय :** गाळा नं. ०५, वैती कंपाऊंड, आई नगर समोर, ओव्हाळा, ठाणे- ४००६१५ भ्रमणध्वनी नं. ९१-9860626595/7400104268 Email Id : dabavlive@gmail.com